सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १८ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

आमच्या बहिणींच्या कोणी आडवं आलं तर गाठ माझ्याशी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा इशारा

पुणे : मी एकच सांगतो की एकवेळा आमच्यावर टीका केली तर आम्ही सहन करू. मात्र, आमच्या बहिणींच्या हिताच्या आडवं कोणी आलं तर मग गाठ माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा, असा सज्जड इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिला.

महायुती सरकारने काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेची मोठी चर्चा आहे. मात्र, या योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. आता जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचा निधी महिलांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरच आज पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ पार पडला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत इशारा दिला.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत मी मंत्रिमंडळात सांगितलं होतं की, रक्षाबंधनाच्या अगोदर या योजनेचे पैसे पोहोचले पाहिजेत. मात्र, हे पैसे पोहोचले की नाही ते पाहण्यासाठी काही लोक म्हणाले की, आधी एक रुपया टाकूयात. त्यांना मी म्हटलं जर एक रुपया टाकला तर विरोधक म्हणतील ३ हजार देणार म्हणाले आणि १ रुपया टाकला. त्यानंतर आम्ही ठरवलं की सर्व तीनच्या तीन हजार रुपये टाकायचे आणि योजना सुरु करायची. तेव्हापासून मी ज्या ठिकाणी कार्यक्रमाला जात आहे, त्या ठिकाणी माझ्या लाडक्या बहीणी मला पैसे आल्याचे सांगतात, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

नालायकांनो आई, बहिणीचे प्रेम कोणीही खरेदी करु शकत नाही

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना ठणकावले

पुणे : महायुतीचे सरकार 'देना बँक' सरकार आहे. लेना वाले नाही. मागच्या काळात वसुली करणारे सरकार होते. एक कोटी तीन लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये पोहोचले आहेत. प्रत्येकाच्या खात्यात पैसे आल्याशिवाय योजना बंद होणार नाही. विरोधक म्हणतात की पंधराशे रुपयात महिलांना विकत घेत आहेत. नालायकांनो आई, बहिणीचे प्रेम कोणीही खरेदी करु शकत नाही. ही योजना माता-भगिणींच्याप्रती कृतज्ञता आहे. त्यांचे प्रेम, साथ यामुळे आम्हाला यश मिळते. परंतु, जे लोक सोन्याचे चमचा घेऊन जन्माला आले. त्यांना पंधराशे रुपयांचे मोल समजू शकत नाही, अशी सडकून टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ बालेवाडीत करण्यात आला. त्यावेळी फडणवीस बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, की परकीयांचे आक्रमण ज्यावेळी आमच्यावार होत होते, त्यावेळी आई जिजाऊंनी सोन्याचा नांगर चालवून स्वराज्याची संकल्पना निर्माण केली. मुलींसाठीची पहिली शाळा पुण्यात सुरु झाली. केवळ राजकारण नाही तर समाजकारण, परिवर्तनाची पुणे ही भूमी आहे. त्यामुळे पुण्यातून या योजनेचा शुभारंभ केला. महायुतीचे सरकार 'देना बँक' सरकार आहे. लेना वाले नाही. मागच्या काळात वसुली करणारे सरकार होते. एक कोटी तीन लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये पोहोचले आहेत. प्रत्येकाच्या खात्यात पैसे आल्याशिवाय योजना बंद होणार नाही. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरचे एकत्रित पैसे दिले जातील. ही खटाखट सारखी नव्हे फटाफट योजना आहे. थेट खात्यांमध्ये पैसे जातात. बहिणींना ओवाळणी द्यायची म्हटल्यावर सावत्र भावांच्या पोटात दुखायला लागले. न्यायालयात गेले. न्यायालयाने नाकारल्यानंतर जाणीवपूर्वक अर्जावर पुरुष, दुचाकी, बगीच्याचे छायाचित्र वापरले. अर्ज बाद होण्यासाठी कारस्थान केले. संकेतस्थळ बंद पडण्यासाठी डेटा (विदा) टाकला.

महिलांचा विकास झाला तरच भारत पुढे जाईल. महिला केंद्रीत योजना सुरु केल्या आहेत. लखपती, लेक लाडकी योजना सुरु केली. अर्थव्यस्थेच्या मुख्य धारेत महिलांना भागीदारी मिळाली पाहिजे. महिलांना अर्थव्यस्थेच्या केंद्रात आणल्यास राज्याची अर्थव्यस्था वेगात वाढेल. पूर्वी सरकारी योजना दलालांची होत होती. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डीबीटीची योजना सुरु केली आहे. आधार, बँक आणि मोबाईल या त्रिशुळमुळे थेट खात्यात पैसे पडले. दलालांचा धंदा बंद केल्याचेही फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिला लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणार

शासन महिलांच्या पाठीशी भक्कमपणे उभे - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

अहमदनगर दि. १७ ऑगस्ट : विद्यमान सरकार हे जनतेच्या मनातील सरकार असुन समाजातील सर्व घटकांच्या विकासाबरोबरच महिलांच्या सक्षमीकरणाला शासनाचे प्राधान्य आहे. शासन महिलांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असुन जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिला लाभार्थ्यांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसुल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील सहकार भवन येथे मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिणी योजनेच्या राज्यस्तरी शुभारंभ कार्यक्रमाच्या सहप्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपस्थित महिला लाभार्थ्यांशी संवाद साधताना पालकमंत्री श्री विखे पाटील बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री विखे पाटील म्हणाले की, पुणे येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेच्या भव्यदिव्य अशा राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला. ऐतिहासिक अशा कार्यक्रमाचा साक्षीदार होण्याची संधी मिळाल्याची भावना व्यक्त करत महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत महिला केंद्रीत योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आज एस.टी भाड्यामध्ये शासनाने महिलांना ५० टक्के सवलत दिली आहे. तसेच राज्यातील मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णयही शासनाने घेतला असुन शासन महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

राज्यातील सर्वच घटकांचा विकास होण्याच्यादृष्टीने शासन अनेक योजना राबवित आहे. युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत युवकांना ६ हजार, ८ हजार व १० हजार रुपये प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण घेतल्यानंतर दरमहा शासनाकडुन डीबीटीद्वारे थेट युवकांच्या बँक खात्यामध्ये विद्यावेतन म्हणुन जमा करण्यात येणार आहेत.

आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडून हजारो महिलांना रक्षाबंधनानिमित्त साड्यांचे वाटप

तभा वृत्तसेवा

हिंगोली, १७ ऑगस्ट

श्री क्षेत्र नरसी नामदेव येथे रक्षाबंधन व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे निधी वाटपाचे औचित्य साधुन कार्यसम्राट आमदार तान्हाजीराव मुटकुळे साहेब यांनी विधानसभेतील नर्सी नामदेव येथील सेवाधारी लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाची ओवाळणी म्हणून साड्या वाटपाचा कार्यक्रम केला. यावेळीं हजारो सेवाधारी बहिणी उपस्थिती होत्या.

अद्यापही राहिलेले बहिणीचे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरून घेण्याकरिता शिबिराचे आयोजन आ मुटकुळे यांनी केले होते.या कार्यक्रमास आ तान्हाजीराव मुटकुळे यांच्या सुविद्य पत्नी सौ. जिजाबाई मुटकुळे यांच्या हस्ते सेवाधारी महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यानिमित्ताने संभाजीनगर येथील

गायक कलावंतांचा गीत गुंजन हा अभंग व भावगीतांचा कार्यक्रम सुद्धा डॉ. संजय नाकाडे व हर्षवर्धन परसावळे यांचे पुढाकाराने सादर करण्यात आला. श्रीकांत उमरीकर यांनी अतिशय सुरेल अभंग व भावगीते सादर करून उपस्थित महिला भगिनींची मने जिंकली. उपस्थित महिलांनी सुद्धा कलावंतांना भरभरून दाद दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांबाळे, माजी आ.रामराव वडकुते, के.के. शिंदे, नारायणराव खेडेकर, बळीराम मुटकुळे, युवमोर्चा अध्यक्ष पप्पु चव्हाण, शिवाजी मुटकुळे, रामदास पाटील, ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव सौ रजनी पाटील, सरचिटणीस छायाताई मरडे, महिला शहरअध्यक्ष अल्का लोखंडे, सौ. राजामती शिवाजीराव मुटकुळे, संतोष टेकाळे, श्रीरंग राठोड, नंदू खिल्लारे, हिंमत राठोड, माणिकराव लोढे, कांतराव घोंगडे, आप्पासाहेब देशमुख, श्रीराम देशमुख, अमोल तिडके आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून बोल्हेगाव परिसरात औषध व धूर फवारणी

मा.सभापती कुमार सिंह वाकळे यांची माहिती

नगर : पावसाळ्यात उद्भवणारे डेंग्यू, चिकनगुनिया, गोचीडताप इत्यादी आजार रोखण्यासाठी प्रभाग क्र. ७ - बोल्हेगाव परिसरात आ.संग्राम जगताप यांच्या माध्यमातून डास प्रतिबंधक औषध व धूर फवारणी करण्यात येत असल्याची माहिती महापालिका स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांनी दिली.

पावसाळ्यात पोषक वातावरण तयार झाल्यामुळे डासांचे प्रमाण वाढून विषाणूजन्य आजारांचा प्रसार होतो. त्यामुळे डास उत्पत्ती होणारी स्थाने नष्ट करून त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी स्वतः ची यंत्रणा उभारत शहरात ठीकठिकाणी डास प्रतिबंधक औषध व धूर फवारणी सुरू केली आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक ७ मध्ये नुकत्याच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या. जेणेकरून नागरिकांचे आरोग्य सदृढ निरोगी राहण्यास मदत होईल. महागड्या आरोग्य सेवेमुळे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आजारी पडल्यानंतर आजारपण आपल्या अंगावरच काढत असतात, यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी मदत करावी, बोल्हेगाव येथे मनपाचे आरोग्य केंद्र सुरू झाले, असून या परिसरातील नागरिकांना मोफत प्राथमिक आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिले असल्याची माहिती माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांनी दिली. यावेळी संतोष ढाकणे, दिलीप राख, किशोर नलगे, विलास भिंगारदिवे, नवनाथ कोलते, नवनाथ वाकळे, पवन चाफे, रंगनाथ गवळी, सुरज कोलते, योगेश भोसले, पांडुरंग कदम, सुरेश अडसूळ, संतोष वाटमोडे, पंकज वाकळे, शेख हबीब, नयन ससे, श्याम वाकळे, दशरथ वाकळे, रावसाहेब वाटमोडे, शंकर वाटमोडे, गोरख वाटमोडे, शिवाजी कराळे, करण वाकळे, रमेश वाकळे, आकाश वायकर, सचिन कदम, पंकज लोखंडे, अंबिका घोलप, सचिन शेकटकर, अक्षय दुधाळ, विलास जाधव, संदीप कापडे, संदेश वाटमोडे, सावळेराम कापडे, तुषार सोनवणे, अतुल देठे, अरुण थिटे, ज्ञानदेव कापडे, बाळासाहेब धीवर, नवनाथ भोर आदीसह नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत उद्योग व सहकारी संस्थांनी युवकांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

अहमदनगर दि. १६ ऑगस्ट : युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. जिल्ह्यातील दहा हजार युवकांना या योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात अआले असुन जिल्ह्यातील विविध उद्योग व खाजगी आस्थापनांनी शासनाच्या या उपक्रमात सहभागी होत जिल्ह्यातील अधिकाधिक युवकांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याचे आवाहन राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अनुषंगाने विविध उद्योग, आस्थापनांच्या प्रतिनिधीसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पालकमंत्री श्री विखे पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, कौशल्य विभागाचे सहायक आयुक्त निशांत सुर्यवंशी आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री विखे पाटील म्हणाले की, शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातुन रोजगार इच्छुक युवक आणि रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक जोडले जाणार आहेत. विविध उद्योगातुन कौल्यावर आधारित प्रशिक्षण घेतल्यानंतर या युवकांमध्ये नोकरी मिळविण्याची क्षमता अधिक प्रमाणात वृद्धींगत होणार आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणादरम्यान १२ वी पास असणाऱ्या युवकांना ६ हजार रुपये, आय.टी.आय अथवा पदविका धारकांना ८ हजार रुपये तर पदवीधर, पदव्युत्तर युवकांना १० हजार रुपये प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण घेतल्यानंतर दरमहा शासनाकडुन डीबीटीद्वारे थेट युवकांच्या बँक खात्यामध्ये सहा महिन्यांसाठी विद्यावेतन देण्यात येणार असल्याने अधिकाधिक उद्योगांनी या उपक्रमात सहभाग नोंदवावा. उद्योगांच्या मागणीनुसार विभागाने इच्छुक युवक त्यांना उपलब्ध करुन द्यावेत. जिल्ह्यातील सर्व आयटीआय व महाविद्यालयात युवकांसाठी नोंदणी शिबीराचे आयोजन करत या योजनेची अधिक व्यापक स्वरुपात प्रचार प्रसिद्धी करण्याचे निर्देशही पालकमंत्री श्री विखे पाटील यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, सहकारी संस्था, सहकारी बँका, पतसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या व दुग्धव्यवसाय सहकारी संस्थांच्या प्रतिनिधीसमवेतही पालकमंत्री श्री विखे पाटील यांनी संवाद साधला.

जिल्ह्यात मोठ्या स्वरुपामध्ये सहकारी साखर कारखाने तसेच विविध सहकारी संस्था कार्यरत आहेत. या कारखाने व संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये मनुष्यबळाची मागणी असते. शासनाने सुरु केलेल्या या प्रशिक्षण योजनेतुन संस्थांना मनुष्यबळ मिळण्याबरोबरच युवकांना प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

कोलकाता हत्याकांडाच्या निषेधार्थ आज देशभरातील डॉक्टरांचा संप!

मुंबई : कोलकातामध्ये महिला डॉक्टरची अत्याचारानंतर हत्या करण्यात आल्याने देशभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने आज देशभरातील सर्व सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये आज संप पुकारला आहे. या प्रकरणी आधीही दोन दिवस संप केला होता. मात्र त्यानंतर सरकारशी झालेल्या चर्चेनंतर संप मिटवण्यात आला. दरम्यान, दिल्ली एम्समध्ये डॉक्टरांनी कँडल मार्च काढला त्यामध्ये डॉक्टरांनी कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरला न्याय देण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोलकातामधील अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने आज सकाळी ६ ते रविवारी सकाळी ६ वाजेपर्यंत संपावर असणार आहेत. या काळात रुग्णांची ओपीडी आणि ऑपरेशन्स होणार नाहीत. मात्र, आपत्कालीन सेवा सुरू राहतील. २४ तासांच्या या संपामुळे देशातील वैद्यकीय सेवेवर याचा मोठा परिणाम दिसून येणार आहे.

डॉक्टरांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची आहे, असे मत व्यक्त करत मृत महिला डॉक्टरला न्याय, डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय कायदा आदी मागण्या घेऊन हे आंदोलन केले जाणार आहे. देशभरातील डॉक्टरांनी संप पुकारल्याने आरोग्यव्यवस्था कोलमडली आहे. या संपकाळात बाह्य रुग्ण सेवा (ओपीडी) तसेच नियोजित शस्त्रक्रिया बंद राहणार आहे. तर अत्यावश्यक वैद्यकीय सेवा आणि अत्यावश्यक शस्त्रक्रिया सुरू राहणार आहेत.

फारोळा येथील धुत कॉम्पेक कंपनीत सुपरवायझर ने गळफास घेऊन केली आत्महत्या

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. १७ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छत्रपती संभाजीनगर रोडवरील फारोळा गावातील असलेल्या धुत कॉम्पेक कंपनीतील कार्यरत असलेल्या सुपरवायझर ने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज दि. १७ शनिवार रोजी पहाटे ५:०० वाजेच्या सुमारास घडली आहे.सविस्तर माहिती अशी की सादरील सुपरवायझर देविदास गणपतराव किडे (वय.५४ वर्ष) रा. मानसपुरी जि. नांदेड, ह मु. अयोध्या नगर सिडको, छत्रपती संभाजीनगर असे मयताचे नाव आहे.धुत कॉम्पेक कंपनीतील स्टाफ म्हणून कार्यरत असलेले देविदास किडे हा दि.१६ शुक्रवार रोजी रात्रपाळीच्या रात्री सात ते सकाळी सात या बारा तास शिफ्ट नुसार कामासाठी आला होता. प्रोडक्शन लाईन मध्ये सुपरवायझर म्हणून मागील २५ वर्षांपासून कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे क्वालिटी कंट्रोल चे कर्मचारी हे पहाटे देविदास किडे यांची सही घेण्यासाठी गेले असता देविदास किडे गळफास लावल्याच्या स्थितीत आढळुन आले असल्याची माहिती समोर आली आहे.याबाबतची माहिती मिळताच बिडकीन पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे व संदीप धनेधर यांनी घटनास्थळी धाव घेऊन देविदास किडे यास पुढील उपचारासाठी बिडकीन ग्रामीण रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता मात्रे यांनी तपासून मृत घोषित केले पोलीस पंचनामा करत असताना मयताच्या जवळ चिठ्ठी मिळुन आली असून याबाबत ची माहिती अद्ययावत समोर आलेली नाही. आत्महत्याचे कारण समजू शकले नाही,शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे,सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे ,संदीप धनेधर पुढील तपास करीत आहे.

फारोळा ग्रामपंचायत येथे हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम व स्वातंत्र्यदिन साजरा

बिडकीन दि १६ ऑगस्ट पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत येथे हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले.हर घर तिरंगा म्हणजे घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत १३ ते १५ ते ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात आला.७८ स्वातंत्र दिना निमित्त १३ ते १५ ऑगस्ट तीन दिवस ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच.सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला. लगेच १८ वर्षा वरील शिक्षण घेणाऱ्या दोन मुलींचा सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत तर्फे जिल्हा परिषद शाळेत मुलांना बिस्कीट पुडे वाटप करण्यात आले.या वेळी उपस्थित ग्रामसेवक आशाताई तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण, इलियास पठाण, मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख उमेश सोनवणे, तलाठी रविंद्र मोखेडे,रेखा इंदापूरे,मीरा हाडे,गायत्री तुपे, कांचन बिडकर,मीना पवार,कोमल निकम, मीनाक्षी धुमाळ,अनीता पटारे,शालीनी थोरात, अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे, दिलीप गोरे,तेजस जाधव,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ,सर्व शिक्षक वृंद, प्रतिष्ठीत नागरिक अदि गावकरी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमातून घडवली संस्कृती, देशभक्तीचे दर्शन

बिडकीन दि १६ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील किलबिल प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिनानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमात देश रंगीला रंगीला.. ऐ वतन आबाद रहे तू ..जहा पाव मे पायल ..तेरे मिट्टी मे मिल जावा... नृत्यांगना, साहसी मानवी मनोऱ्यांच्या

माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीचे दर्शन घडवले. देशभक्ती शिखरावर नेणाऱ्या गीतांचा देखना कार्यक्रम शाळेमध्ये रंगला यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. देशभक्तीची भावना जागृती करणाऱ्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी व पालकांनी मनसोक्त आनंद घेतला. देशभक्तीचा उत्साह वाढवा मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सुजित देशमुख व शिक्षक वृंद पालक वर्ग वाहन चालक-मालक उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनानिमित्त बालविवाह जनजागृती व तिरंगा रॅलीचे भगवती विद्यालय, बिडकीन येथे आयोजन

बिडकीन दि १७ नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर, शिवसेवा बहुउद्देशीय संस्था, भगवती विद्यालय बिडकीन, यांच्या संयुक्त विद्यमाने ७८ व्यां स्वातंत्र्य दिनानिमित्त बालविवाह जनजागृती रॅली व तिरंगा रॅली काढण्यात आली.शाळाचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समाजामध्ये बालविवाह विषयी जनजागृती निर्माण व्हावी व आपल्या देशाविषयी लोकांच्या मनात देशभक्ती कायम राहावी हा प्रमुख उद्देश्य या कार्यक्रमाचा होता. रॅली दरम्यान बालविवाह जनजागृतीची विविध स्लोगनचे पोस्टर मिरवण्यात आले.भाषण, चित्रकला, वेशभूषा निबंध स्पर्धा कार्यक्रम घेण्यात आल्या .सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी केले तर आभार खुशाल चव्हाणं यांनी मानले या प्रसंगी श्रीधर जऱ्हाड,रायभान रकटे , सुनील पवार आप्पासाहेब किसवे, शमीमबानो शेख, विश्रांती सलगरे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड,अशोक दुबे, पंकज धुळे, सरपंच अशोक धर्मे, स्वातंत्र सैनिक रंगनाथ आप्पा हिवाळे यांची उपस्थिती होती, तर विश्व युथ फाऊंडेशन, संकेत मोरे, अष्टांग पंडीत, वैभव जाधव यांचे सहकार्य लाभले.

गॉडफोड्रिक इंटरनॅशनलनचे माय सुपर ॲप लाँच, स्थानिक व्यवसायांसाठी डिजिटल क्रांती

छत्रपती संभाजीनगर - गॉडफोड्रिक इंटरनॅशनलने स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून आपले नाविन्यपूर्ण माय सुपर प लॉन्च करण्याची घोषणा केली, जे महाराष्ट्रातील स्थानिक व्यवसायांची सद्यस्थिती बदलण्यास तयार आहे.हे ग्राउंडब्रेकिंग प सुरुवातीला संभाजीनगरसह चार प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध असेल, ज्याचा उद्देश लहान उद्योगांना सक्षम करणे आणि ग्राहकांचा अनुभव वाढवणे आहे. या सध्याच्या युगातडिजिटल सोल्यूशन्स सर्वोपरि आहे, माय सुपर ॲप हे कंमिशन ॲंड सुब्स्क्रिप्टिव मॉडेल सोबत येत आहे जे स्थानिक व्यवसायांच्या विविध गरजांनुसार त्यांना त्यांचा सोइ नुसार ते वापरता येणार आहे. हा अग्रगण्य दृष्टिकोन व्यवसायांना इष्टतम साधने आणि सेवा निवडण्याची संधी देतो , आणि हे सुनिश्चित करून की त्यांच्याकडे स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी आवश्यक संसाधने आहेत.

लेप्टोस्पायरोसिस पासून सुरक्षित राहण्यासाठी सोपे उपाय

छत्रपति संभाजीनगर -पावसाळ्यामधील चिंताजनकबाब म्हणजे पाण्यामाफर्त अनेक आजार पसरतात आणि वेळेवर त्यांचे निदान व उपचार करून घेणेअत्यंत महत्त्वाचे आहे. पावसाळ्यामध्ये पाणी साचणे टाळता येऊ शकत नाही, तसेच सांडपाण्यामधूनबाहेर पडणाऱ्या दूषित पाण्याच्या संपकार्त येण्याची शक्यता देखील असते. यामुळे पावसाळ्यादरम्यानसुरिक्षत राहण्यासाठी खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे. फक्त पाण्याने हाय-पाय धुणे पुरेसेनाही. हात-पाय स्वच्छ धुण्यासाठी १५ भाग शुद्ध पाण्यामध्ये एक भाग सॅव्हलॉन एंटीसेप्टिकडिसइन्फेक्टण्ट लिक्विड मिसळले पाहिजे. हा पावसाळ्यादम्यान होऊ शकणाऱ्या आजारांपासूनसुरिक्षत राहण्यासाठी सोपा उपाय आहेलेप्टोस्पायरोसिसची - सेंटर फॉर डीसीज कंट्रोलअण्ड प्रीव्हेन्शन (सीडीसी) यांच्या मते, लेप्टोस्पायरोसिस (डशीॉिळीॉळी) हा माती,पाणी व वनस्पती दूषित करणारे प्राण्यांचे मूत्रआणि विष्टेद्वारे प्रसारित होणारा जीवाणूजन्य संसर्ग आहे। या संसर्गासाठी कारणीभूत जीवाणूला लेप्टोस्पायराम्हणतात. उंदीर, कुत्रे, घोडे, डुक्कर किवा गायी याप्राण्यांमाफर्त (एकतर भटक्या किंवाघरगुती) संसंसर्ग पसरू शकतो.व्यक्तीला लेप्टोस्पायरोसिसआजार कसा होतो? लप्टोस्पायराची लागणझालेल्या प्राण्यामुळे पाणी किंवा माती दूषित होते , ज्यामळे जीवाण इतर प्राण्यांमध्येकिंवा मानवांमध्ये पसरतात. व्यक्तीला पुढील माध्यमातून लेलेप्टोस्पायरोसिस होऊ शकतो: लेप्टोस्पायराची लागणझालेल्या प्राण्यांचे मूत्र किंवा इतर शारीरिक द्रवांशी प्रत्यक्ष संपर्क होणे. डोळे, तोंद, नाक, जखमझालेली त्वचा, श्लेष्मल त्वचा किंवा खुल्या जखमा यांचा प्रत्यक्ष दूषित पाणी किंवामातीशी संपर्क येणे. लेप्टोस्पायरोसिसचा प्रादूर्भावसहसा सांडपाण्यासारख्या दूषित पाण्याच्या संपर्कात आल्याने होतो. पावसाळ्यात या प्रादूर्भावाचीशक्यता वाढते, कारण ड्रेनेज लाइन गळतीमुळे रस्त्यावर पाणी साचते, पिरणामत: आजार होण्याचाधोका वाढतो. आजाराचा इन्क्यूबेशन कालावधी साधारणतः ५ त १४ दिवसांचा असतो, जो २ ते ३०दिवसांचा दखील असू शकतो.

कन्नड तालुक्यात स्वातंत्र्यदिन साजरा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१६ ऑगस्ट :- कन्नड तालुक्यात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात शासकिय ,निमशासकीय,शाळा,महाविद्यालय, साजरा करण्यात आला. तहसिल कार्यालयात सकाळी ०८:०५ वाजता तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले,यावेळी नायब तहसिलदार दिनेश राजपूत, मंडळ अधिकारी दिनेश राजपूत, तलाठी दिपक एरंडे सह तहसिल कार्यालयातील कर्मचारी, तलाठी मंडळ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती

नगरपरिषद कार्यालय

सकाळी ०८:१५ वाजता नगरपरिषद येथे महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुख्याधिकारी तथा प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते ध्वजारोहन संपन्न झाले,नगर पालिकेच्या वतीने कन्नड शहरात

राबविण्यात आलेल्या योजनांच आढावा याठिकाणी देण्यात आला यावेळी कार्यालयीन अधिक्षक प्रशांत देशपांडे,लिपिक नारायण कनगरे,अभियंता नितीन रेवानवार,संजीव सोनार,गणेश अंदुरे,लेखापाल ऋषिकेश क्षीरसागर,स्वच्छता निरीक्षक प्रमोद तुपे,पाणीपुरवठा अभियंता प्रशांत मेश्राम, पाणीपुरवठा निरीक्षक देविदास पाटील,शीतल चौधरी,वैशाली दाभाडे,शोभा साठे,आशाबाई जाधव, शेह्बाज अली,मुमताज अली,पसीओद्दिन मसीओद्दिन,रवी रजोरा,मितेश बेद,मुकेश रजोरा,वाल्मिक शिरसाठ,गोपाल घावरी,मोहन पंडीत,सिद्धार्थ बनकर, सह माजी नगरसेवक शहरातील प्रतिष्ठित नागरिक,सेवानिवृत्त कर्मचारी आदींची उपस्थिती होती

उपविभागीय अधिकारी कार्यालय

उपविभागीय अधिकारी कार्यालयात सकाळी ०९:०५ वाजता महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आमदार उदयसिंग राजपूत, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते पूजन करण्यात आले,

कन्नड शहर पोलिसांनी राष्ट्रीय ध्वजास सलामी दिली त्यानंतर उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले,यावेळी आमदार उदयसिंग राजपूत, तहसीलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक,मुख्याधिकारी तथा प्रशासक नंदकिशोर भोंबे, ग्रामीण पोलिस स्टेशन सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार,पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके, नायब तहसिलदार प्रशांत काळे,दिनेश राजपूत, भूमिअभिलेख उपअधीक्षक कैलास निसाळ, करन जारवाल, सत्यनारायण शेट्टी,रामेश्वर लोखंडे, जीवन चव्हाण,अभिजित पानट, हर्षल वाघ,विजयानंद निकाळजे,सह सर्व विभागातील अधिकारी,कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार,उपस्थित होते

खैरगाव येथे ग्रामपंचायतच्या वतीने स्वतंत्रदिना निमित्य ग्रामपंच्यात कार्यालयावर ध्वजारोहण करताना ग्रामपंचायत सरपंच ,ग्रामसेविका ,अंगणवाडी सेविका आदी दिसत आहेत.

बांगला देश घटनेच्या निषेधार्थ सोयगाव शहरासह तालुक्यात कडकडीत बंद : शहरातून मूक मोर्चा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट

बांगलादेशाच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी सोयगाव शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने मूक मोर्चा काढून कडकडीत बंद पाळण्यात आला शहरासह तालुक्यात शंभर टक्के शांततेत बंद यशस्वी झाला आहे.

सोयगाव शहरातील जुना बाजार चौक परिसर,व्यापारी गल्ली,भवानी पूरासह शहरातील विविध भागातून छत्रपती शिवाजी महाराज चौकात या मोर्चाचा समारोप करण्यात आला.यावेळी ह.भ.प.कन्हैय्या महाराज परदेशी यांनी मोर्चाला मार्गदर्शन केले.त्या नंतर सकल हिंदू समाजाच्या वतीने ह.भ.प.कन्हैय्या महाराज परदेशी,ह.भ.प.जान्हवीताई सोनवणे,ह.भ.प.सुधन्वा केनेकर,ह.भ.प.रवींद्र महाराज परेराव,ह.भ.प.निवृत्ती महाराज मोहने,सुनिल गव्हाडे,दीपक सोनवणे,कृष्णा पाटील जुनघरे,निलेश नागपुरे,भारत हिरे, योगेश मानकर,मंगेश सोहणी,हस्ते प्रशासनाला बंद चे निवेदन देण्यात आले.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,महसूलचे दयानंद जिरगे,निवृत्ती कपासीकर यांनी मोर्चा चे निवेदन स्वीकारले.यावेळी सुनील गव्हाडे,कैलास काळे,दीपक सोनवणे,भारत हिरे,सचिन चौधरी,निलेश नागपुरे,मंगेश सोहणी,योगेश मानकर,आकाश जाधव,अजय मंडवे,संजय मोरे,कैलास काळे,कृष्णा भैय्या जुनघरे,सुनील मिरकर,राहुल राठोड,सुनील ठोंबरे,संदीप चौधरी,निलेश नागपुरे,आकाश परदेशी,अजय मंडवे,ईश्वर मंडवे,भगवान मंडवे,योगेश इंगळे,योगेश राऊत,सोयगाव व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विवेक महाजन,सुधीर नाना कुलकर्णी,संजय मोरे,सुनील मोरे,अक्षय विसपुते,राजू फुसे,संदीप काळे,हर्षल बारी,बाळू झंवर,रविराज गिरी,सचिन चौधरी,बद्री राठोड,आप्पा वाघ,सुनील ठोंबरे, प्रमोद रावणे,मयूर मनगटे,अरुण काळे,दिलीप मंचे,बापू मानकर,संजीवन सोनवणे,आदिंसह सकल हिंदू हिंदू समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी शहरासह बनोटी,जरंडी,वरठाण,घोसला आदिंसह गावात बंद शांततेत यशस्वी झाला.यावेळी सोयगाव शहरात पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला.मोर्चा दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल साबळे,पोलीस उपनिरीक्षक सतिष बडे,पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,जमादार राजू बर्डे,दिलीप पवार,संदिप सुसर,संजय सिंगल,गजानन दांडगे,रवींद्र तायडे,अजय कोळी,सतिष पाटील,होमगार्ड विनोद इंगळे,विजय रावणे,आदींनी मोर्चा दरम्यान बंदोबस्त ठेवला होता.

मेडिकव्हर हॉस्पिटल तर्फे आरोग्यतज्ज्ञांच्या समर्थनार्थ राष्ट्रीय आंदोलनात सहभाग

छत्रपती संभाजीनगर : १७ ऑगस्ट २०२४ - मेडिकोव्हर हॉस्पिटल्सने कोलकाता येथे एका महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ तसेच भारतभरातील आरोग्यतज्ज्ञांच्या समर्थनार्थ भारतीय मेडिकल असोसिएशन (खच-) आयोजित राष्ट्रीय आंदोलनात सक्रियपणे सहभाग घेतला आहे. या आंदोलनानंतर मेडिकव्हर हॉस्पिटल्सने सर्व रूटिन आऊटपेशंट विभाग (जझऊ) आणि इलेक्टिव्ह सर्जरी सेवा तात्पुरत्या स्वरुपात थांबवल्या आहेत. हे पाऊल आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या प्रमुख मुद्द्यांसाठी असलेल्या आक्रोशाचे आणि सुधारणा आवश्यकतेचे लक्ष वेधून

घेण्यासाठी उचलले आहे.

आंदोलनाच्या दरम्यान, मेडिकव्हर हॉस्पिटल्सने आवश्यक सेवांचे हवे असलेले कार्य सुरू ठेवले आहे. आपत्कालीन सेवा, ज्यामध्ये क्रिटिकल केअर आणि आपत्कालीन सर्जरींचा समावेश आहे, पूर्णपणे कार्यरत आहेत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जात आहे. या निर्णयाने हॉस्पिटलने रुग्णांच्या काळजीला प्राथमिकता देत असताना आरोग्य क्षेत्रातील व्यापक समर्थनाच्या प्रयत्नांचे समर्थन केले आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे अनेक प्रमुख वैद्यकीय तज्ज्ञ या आंदोलनात सक्रियपणे सहभागी झाले आहेत. यामध्ये डॉ. दीपेन शाह (केंद्र प्रमुख),डॉ.तुकाराम औटे , डॉ. विक्रांत व्ही देशमुख , डॉ. कुलदीप तोटावार, डॉ. श्रीकांत देशमुख , डॉ . आनंद औटी , डॉ. मनिष पुराणिक , डॉ. आनंद डंक , डॉ.चंद्रशेखर चव्हाण, डॉ. जानकीदेवी बोराडे , डॉ. राहुल गोसावी , डॉ. आनंद कर्नावत , डॉ. अनुप तोष्णीवाल , डॉ. खुशबू जैन कर्नावत , डॉ. समिध पटेल , डॉ.आनंद देशमुख , डॉ. प्रसन्न देशमुख , डॉ. आनंददीप अग्रवाल , डॉ. उर्मिला रोटे , डॉ. सुवर्णा जावळे , डॉ. श्वेता देशमुख (ठाकूर), डॉ. विकास शिंदे यांनी , डॉ.अभिषेक बुजाडे, डॉ. स्नेहा शिंदे , डॉ. सचिन सोनी , डॉ . शरद शेळके ,डॉ . मयूर दळवी , डॉ . विवेक देशमुख , डॉ . निकेत मंत्री , डॉ . गिरिजा सचदेव , डॉ . कपिल पोरे , डॉ.पुनित मालपाणी, डॉ . किशोर मुंडे , डॉ . स्वाती यादव , डॉ . दिनेश लाहिरे , डॉ. सुनील मुरके , डॉ.अभिजित कबाडे,डॉ. ,निनाद धोकटे यांनी, डॉ. देवेन देशपांडे यांचा समावेश आहे.

एमजीएममध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १६ : भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिन महात्मा गांधी मिशन एमजीएम स्टेडियम येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी एन्ड्रेस ॲंड हाऊसरचे व्यवस्थापकीय संचालक कैलास देसाई यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्री. देसाई यांनी ध्वजारोहण झाल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना श्री.देसाई म्हणाले, समकालीन काळामध्ये गोष्टी बदलत असून प्रगतीची भविष्यकालीन दिशा आशियाकडे असणार असून यामध्ये प्रामुख्याने भारताकडे जगाचे लक्ष आहे. आपल्या देशाकडे प्रचंड क्षमता असून आपल्या देशाचे भविष्य उज्ज्वल आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था जगातील सर्वात मोठी लोकशाही असून आपल्याकडील कायदेमंडळ, न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ या व्यवस्था चांगल्याप्रकारे कार्य करीत असल्याकारणाने बाहेरची लोकं इथे गुंतवणूक करू शकत आहेत. एमजीएमने आज देशभर किंबहुना जगभर आपली एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. पालक आपल्याला जन्म देतात मात्र, गुरू आपल्याला घडवत असतात. एमजीएम विद्यापीठाने विद्यार्थ्यांनी दर्जात्मक शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. कायम सकारात्मक दृष्टिकोण आणि प्रमाणिकपणा जपत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचा प्रवास करणे आवश्यक असल्याचे श्री. देसाई यांनी यावेळी सांगितले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नृत्य आविष्कार, वृंदगान, विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सादरीकरण, राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित कार्यक्रम, प्रहसन आणि पथसंचलन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पथ संचलनातील उत्कृष्ट पथकाला यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी घाडगे, श्रीशा आपोनारायण, आर्यन डमाळे व हर्षिका दायमा या विद्यार्थ्यांनी केले. भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमासाठी कुलपती अंकुशराव कदम, श्रीमती अनुराधाताई कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, सर्व एमजीएम परिवार व सर्व संबंधित उपस्थित होते.

हिंदूंवर अत्याचाराच्या निषेधार्थ जन आक्रोश मोर्चाचे आयोजन

पैठण दि १७ :- बांग्लादेशात राजकिय उलथापालथ नंतर हिंदूंवर सुरू असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज पैठण शहर व तालुक्याच्या वतीने संकल्प हिंदू राष्ट्र अभियानाचे कार्यवाहक कमलेश कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते खंडोबा महाराज चौका पर्यंत भव्य हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात येणार आहे. बांग्लादेश सरकार विरोधी आंदोलनातून त्याठिकाणी हिंदूंना लक्ष्य करण्यात आले, त्यांची हत्या करणे, त्यांच्या घरावर आक्रमण करणे, हिंदूंची दुकाने लुटणे, मंदिरांची तोडफोड करणे, आग लावणे, हिंदू मुली आणि महिलांवर बलात्कार करणे, हिंदूंना विस्थापित करणे आदी अत्याचार केले जात आहेत. यामुळे तेथील अल्पसंख्याक हिंदूंमध्ये भीतीचे वातावरण आहे. भारत सरकारने तेथील हिंदू समाज आणि मंदिरांच्या रक्षणासाठी तातडीने पावले उचलावीत तसेच भारतात लव जेहाद विरुद्ध कडक शासन करावे,याचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा,बांगलादेशातून येणाऱ्या हिंदूंना तात्काळ भारताचे नागरिकत्व द्यावे. या मागणींसाठी पैठण सकल हिंदू समाजाच्या वतीने मंगळवार दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी १० हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदूंनी या मोर्चात मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

लाडक्या बहिणींनी पाठवल्या मुख्यमंत्रींना राखी

पैठण दि १७ :- राज्य भरातील महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे पैसे बँक खात्यात येण्यास सुरूवात झाली आहे.महिलांच्या बँक खात्यांत ३००० रूपये आल्याने महिलांच्या चेहर्यावर आनंद पाहायला मिळत आहे. पैठण शहरातील महिलांनी एकमेकींना पेढे भरवत आनंद साजरा केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार संदिपान भुमरे,युवानेते विलासबापु भुमरे यांच्या फोटोचे बँनर हातात घेत त्यांचे आभार व्यक्त केले.सर्व महिलांनी एकत्र येत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार संदिपान भुमरे,युवानेते विलास बापु भुमरे यांना लाडक्या बहिनीकडुन राखी बरोबर आभार पत्र पाठवले आहे.या सर्व लाडक्या बहिर्णीनी राखी व आभारपत्र किशोर तावरे यांच्याकडे सपुर्द केले. लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरण्यासाठी युवा नेते विलासबापु भुमरे यांनी विशेष सहकार्य केल्याने तालुक्यातील महिलांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रक्षाबंधना अधिच ओवाळणी भेट दिल्याने यातुन आम्ही लाडक्या भावाच्या ओवाळणीची साडी घेणार आसल्याचे महिलांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी, तहसीलदारसह चार कर्मचाऱ्यांना पुरस्कार

कन्नड :- २०२३-२४ या वर्षात महसूल दिना निमित्त उत्कृष्ट काम करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना छत्रपती संभाजीनगर येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये कन्नड येथील उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्यासह महसूल सहाय्यक सुरेश दुभळकर, मंडळ अधिकारी रंजना कल्याणकर, शिपाई रमेश जाधव, कोतवाल भास्कर राठोड, वाहन चालक दशरथ देहाडे, हतनूर पोलिस पाटील प्रकाश पवार यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सदरील पुरस्कार पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते व विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जि.प. मुख्याधिकारी विकास मीना आदींच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.

पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे युवा नेते कुणाल राजपुत यांनी मानले आभार

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट - सोयगाव तालुक्यातील युवासेनेचे युवानेते कुणाल राजपुत यांनी दि.१३ ऑगस्ट रोजी ना.अब्दुल सत्तार मंत्री अल्पसंख्यांक विकास,पणन व औकाफ तथा पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर यांचे मानले आभार,यावेळेस कुणाल राजपुत यांनी पत्रकार यांच्यांशी बोलताना सांगितले की, सोयगाव तालुक्यातील ज्या शेतकरी बांधवानी मागील वर्षी खरीप स.न. २०२३ मधील कापूस व सोयाबीन या पिकांची ई-पिक पाहणी केली होती अशा कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५००० रुपये प्रमाने (२ हेक्टर च्या मर्यादेत) अनुदान स्वरूपात शासनामार्फत मदत मिळणार असुन याबाबत अधिवेशन मध्ये सरकार मार्फत घोषणा करण्यात आली होती.त्यासाठी आपल्या जिल्हाचे पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी वेळोवेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करुण आज प्रतेक्षात शेतकरी बांधवांच्या आधार लिंक बँक खात्यात डी.बी.टी.(ऊ्हढ) प्रमाणे रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे.त्यामुळे सिल्लोड-सोयगांव मतदार संघातील शेतकऱ्यांच्या वतीने पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांचे मनापासून आभार.

स्वातंत्र्यदिनी शेतकऱ्याचा जिल्हाधिकारी कार्यालयात सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न पोलीसांच्या प्रसंगावधान्याने टळली जीवितहानी

सोयगाव,दि.१७ ऑगस्ट - शेती पिकांच्या नुकसानीची मोबदला न मिळाल्याने सोयगाव तालुक्यातील बाधित शेतकऱ्याने स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम संपल्यानंतर न्याय मिळाला नाही म्हणून अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला मात्र पोलीसांच्या प्रसंगावधानाने मोठी जीवितहानी टळली.

सोयगाव तालुक्यातील घोरकुंड शिवारामध्ये गट क्र.७१ मध्ये महावितरण च्या वीज तारांचा घर्षण होऊन कापणी करून ठेवलेल्या पाच एकर क्षेत्रातील मका पिके व ठिबक संच जळून खाक झाल्या ची घटना (दि.१८) एप्रिलला घडली महावितरण च्या चुकीमुळे शॉर्टसर्किट झाल्याने शेतकऱ्याचे चार लक्ष रु चे नुकसान झाले होते. महसूल व महावितरण ने पंचनामे करूनही गेल्या चार महिन्यापासून संबंधित कार्यालयात चकरा मारूनही नुकसानीचा मावेजा देण्यासाठी महावितरण कडून टोलवाटोलवी केली जात होती महावितरण ने हात वर करत जबाबदारी झटकल्याने आदित्य श्रावण गायकवाड(रा. वरठाण ता.सोयगाव) या शेतकऱ्याने जिल्हाधिकारी कार्यालय येथे न्याय मिळावा अशी मागणी केलेली होती. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणताच प्रतिसाद न दिल्याने सदर शेतकऱ्यांने स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला मात्र वेळीच पोलिसांनी धाव घेत शेतकऱ्यांला ताब्यात घेतल्याने मोठी जीवितहानी टळली. यावेळी सदर शेतकऱ्यांसोबत सुनील सनान्से, प्रसाद वराडे, उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

खोतकर यांच्या सूचनेवरून वरुड येथे वंचित महिलांसाठी विशेष शिबीर!

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत वरुड ता. जालना येथील १२५ महिलांना लाभ मिळाला असून त्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे .याशिवाय योजनेत वंचित राहिलेल्या महिलांसाठी शिवसेना उपनेते, माजी मंत्री तथा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे जालना विधानसभा प्रमुख अर्जुनराव खोतकर यांच्या सूचनेवरून प्रशासनाने शनिवारी (ता. १७) वरुड येथे विशेष शिबिर घेतले. तहसीलदार छाया पवार यांनी वरुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत जाऊन लाडकी बहीण योजने करिता आवश्यक असलेले राशन कार्ड ,जन्म नोंद ,मतदान ओळख पत्र, उत्पन्न प्रमाणपत्र,यासह अन्य कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी

महिलांना विशेष सुविधा उपलब्ध करून दिली. तळागळातील एकही महिला योजनेपासून वंचित राहणार नाही याकरिता कागदपत्रांची पूर्तता करा अशा सूचना तहसीलदार पवार यांनी याप्रसंगी दिल्या.

शाळेच्या परिसरात त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले .यावेळी सरपंच कासाबाई गायकवाड,उपसरपंच शशीकला म्हस्के, मंडळाधिकारी घनगाव ,तलाठी मोरे ,ग्रामसेवक ज्योती मेहेत्रे , गणेश म्हस्के, उत्तम वाहुळे, युवा सेना प्रमुख कृष्णा शिंदे, उपप्रमुख दत्तू म्हस्के, सचिव नवनाथ म्हस्के, मुख्याध्यापक आरमाळ, बी. एल.ओ.तांबे ,ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, शिक्षक वृंद, यांच्या सह महिला व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान सुविधा उपलब्ध केल्या करून दिल्याबद्दल महिलांनी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांचे आभार मानले.

पिरपिंपळगाव येथे भास्कर दानवे यांच्या हस्ते डॉ.आंबेडकर सार्वजनिक सभामंडपाचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

पिरपिंपळगाव येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या खासदार निधीमधून बांधण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सभामंडपाचे लोकार्पण जालना विधानसभा प्रमुख भास्करआबा दानवे यांच्या हस्ते करण्यात आले.

आबांच्या प्रयत्नामधून गावामध्ये अनेक सिमेंट रस्ते, नाल्या - ड्रेनेज अश्या वेगवेगळ्या कामासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिला आहे, त्याच प्रकारे उघड्यावर असणाऱ्या रमाई आणि बाबासाहेबांच्या स्मारकासाठी एक सभामंडप बांधण्यात यावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली होती. यावेळी आबांच्या प्रयत्नातून या सभा मंडपासाठी १० लक्ष रुपयांचा खासदार निधी त्वरित उपलब्ध करून देण्यात आला होता याबद्दल गावकऱ्यांनी आबांचे आभार मानले. तसेच गावातील काही महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा ३००० रुपयांचा पहिला हफ्ता त्यांच्या अकाउंट मध्ये जमा झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून आबंचे आभार मानले. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा युवामोर्चा अध्यक्ष भागवत बावणे, पंचायत समिती सदस्य कृष्णा खिल्लारे, गोकुळ खिल्लारे, अविनाश शिंदे तसेच इतर भाजप कार्यकर्ते व गावकरी मंडळी उपस्थित होते.

संक्षिप्त

श्री छत्रपती शिवाजी प्रा. व मा. आश्रम शाळा, माहोरा येथील इ.६वी ची विद्यार्थिनी कुमारी चैताली बालाजी शेळके हिची विद्यानिकेतन पब्लिक स्कूल कमळेवाडी, नांदेड येथे निवड झाली आहे. या प्रसंगी शाळेच्या वतीने मुख्यध्यापक श्री सिनगारे सर यांनी शाळेच्या वतीने विद्यार्थिनी चा पालकांसह शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा देशाचे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री नामदार रावसाहेब पाटील दानवे (दादा) भोकरदन जाफराबाद मतदार संघाचे युवा तरुण तडफदार आमदार श्री संतोष पाटील दानवे(भाऊ) या विद्यार्थिनीचे अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कालीकुर्ती भागात नाल्या तुंबल्याने नागरिकांत संताप

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना शहरातील कालीकुर्ती भागात नागरी सोयी-सुविधा पुरविण्यात महापालिका अकार्यक्षम ठरत असून, या भागातील नाल्या तुंबल्याने नागरीक अक्षरशः वैतागले आहेत. याकडे लक्ष देवून तात्काळ स्वच्छता न केल्यास आंदोलन छेडण्याचा ईशारा देण्यात आला आहे.

यासंदर्भात महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कालीकुर्ती येथील नागरीकांनी राजकीय पक्षांना डावलून अपक्ष उमेदवाराला विजयी केले होते. मात्र, त्यांनी कुठल्याही सोयी-सुविधा पुरविण्याकडे लक्ष दिले नाही. आजघडीला परिसरात नागरी सुविधांचा अभाव आहे. प्रभागात सिमेंट नाल्या, पथदिव्यांची कुठलीही कामे झालेली नाहीत. तसेच अस्वच्छतेमुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या भागाला खुद्द आयुक्तांनी भेट देवून समस्यांची पाहणी करीत त्या सोडविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर ते पुन्हा प्रभागाकडे फिरकलेच नाहीत. त्यामुळे प्रभागात तुंबलेल्या समस्या न सुटल्यास उपोषण करण्याचा ईशारा या निवेदनाच्या शेवटी सय्यस सलिम सय्यद खाजा यांच्यासह नागरीकांनी दिला आहे.

दाढेगाव येथील माजी सरपंच राष्ट्रवादी मधून शिवसेनेमध्ये कार्यकर्त्यासह केला प्रवेश

तभा वृत्तसेवा
घनसावंगी/प्रतिनिधी

घनसांगवी येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे व डॉ.हिकमत दादा उढाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दाढेगाव येथील राष्ट्रवादीचे माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य शेषराव मामा उघडे यांच्या राष्ट्रवादीतून आपल्या कार्यकर्त्यासह शिवसेनेत केला प्रवेश या यावेळी डॉ हिकमत उढाण यांनी माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य सर्व कार्यकर्त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

तभा वृत्तसेवा

जालना : राजस्थानच्या राज्यपाल पदी हरिभाऊ बागडे यांची नियुक्ती झाल्यामुळे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी त्यांची छत्रपती संभाजीनगर येथे भेट घेतली व शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, मेघराज चौधरी व छ.संभाजीनगर येथील अनेक मान्यवर उपस्थित होते.

दोन धर्मियामध्ये जातीय तेढ निर्माण करणाऱ्या रामगिरी गिरी महाराजांचा निषेध

गुन्हा दाखल करण्याची मागणी; पोलीस निरिक्षक यांना निवेदन

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

सरला बेट येथे एका सप्ताहा दरम्यान प्रवचनामध्ये महंत रामगिरी महाराज यांनी मोहम्मद पैगंबर यांच्या व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल.असे जाणिवपुर्वक आक्षपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ शनिवारी भोकरदन येथे मुस्लिम बांधवांनी या वक्तव्याचा निषेध करत महाराजाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी पोलीस प्रशासनाला निवेदनाव्दारे केली.मुस्लिम समाजाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली की, सरला बेट काही दिवसापासून आध्यात्मिक पारायण सुरु आहे.त्या पारायणात सरला बेट चे मठाधिपती महंत महाराज यांनी मुस्लिम धर्माचे प्रेषित मुहम्मद

पैगंबर यांच्या बाबतीत आक्षपार्ह विधान केले.

या वक्तव्यामुळे व अशा प्रकारच्या प्रवचनामुळे हिंदु-मुस्लीम या दोन समाजामध्ये जातीय तणाव, धार्मिक व्देष पसरवण्याचा जाणिवपुर्वक प्रयत्न केला जात गेला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी अशा भामट्या रामगिरी महाराजाकडुन मुस्लिम धर्मियांविरोधात जाणुनबुजुन धार्मिक भावना दुखवून जातीय दंगल घडविण्याच्या इराद्यात वक्तव्य करुन घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.तसेच नितेश राणे हा सुध्दा दोन समाजात धार्मिक तेढ निर्माण करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उध्दभवावा म्हणुन जाणुन बुजुन चिथावणीखोर भाषण करत आहे.भामट्या रामगिरी महाराजाने केलेल्या वक्तव्यामुळे समाज जीवनातील एकोपा, सामाजिक बंधुभाव धोक्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भिती आहे.सध्या गणेशोत्सव तोंडावर आलेला आहे.त्या पाठोपाठ महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होत आहे,त्यामुळे आपण समस्येचे गांभीर्य ओळखून रामगिरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट ता. वैजापुर यांच्यावर विविध कलमांतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी मुस्लिम धर्मगुरू व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे लोकार्पण सोहळा

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

सिल्लोड कॉर्नरवरील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात नगर परिषदच्या वतीने नुकतेच स्मारकाचे नूतनीकरण करण्यात आले असून त्याचा लोकार्पण सोहळा आज रविवारी १८ रोजी दुपारी ३.०० वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांच्या हस्ते व पूज्य भदंत एस प्रज्ञाबोधी महाथेरो व पूज्य भदंतशिवली शाक्यपूत्र यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. विशेष म्हणजे स्मारकात प. पू.बो. डॉ बाबासाहेब आंबेडकरस्मारक समिती व जनतेच्या सहभागातून उभारण्यात आलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे उद्घाटन ही होणार आहे. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे तर प्रमुख अतिथी म्हणून खा डॉ कल्याणराव काळे उपस्थित राहणार आहेत. तर पाहुणे म्हणून आ संतोष दानवे,एस के भंडारे, माजी आ चंद्रकांत दानवे,सुदामराव सदाशिवे ,सुधाकर भाई निकाळजे,विलास डोळसे, डॉ संजय पगारे, महेंद्र बनकर, डेव्हिड घुमारे, राजाभाऊ देशमुख, ऍड हर्षकुमार जाधव, आशाताई माळी,चंद्रकांत पगारे,मुकेश चिने, इरफानोद्दीन सिद्दीकी यांच्यासह उपविभागीय अधिकारी डॉ दयानंद जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे, तहसीलदार संतोष बनकर, मुख्याधिकारी संतोष वाघमारे, गटविकास अधिकारी गजानन सुरडकर, पोलीस निरीक्षक किरण बिडवे,अभियंता किशोर ढेपले, कॉन्ट्रॅक्टर विजय बनकर, शिल्पकार नंदकुमार हुंबे आदी उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व बांधवांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहनप पू बो डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,भारतीय बौद्ध महासभा,डॉ बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन,सम्राट अशोक नवयुवक मित्रमंडळ,सम्राट भोगवर्धनबुद्ध विहार समिती,सुजाता महिला मंडळ व सर्व बौद्ध समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

काँग्रेसची विचारधारा सर्वांना सोबत घेऊन चालणारी- मा.आ.सुरेशकुमार जेथलिया

शेतकरी व युवकांशी संवाद यात्रेला उस्फुर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
परतुर /प्रतिनिधी

काँग्रेसची विचारधारा सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारी असून या चळवळीत शेतकरी व आजच्या युवा वर्गाने सहभागी व्हावे अशी साध मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांनी घातली, आजपासून मतदारसंघात सुरु झालेल्या शेतकरी-युवक संवाद यात्रेत ते बोलत होते. शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट रोजी पाटोदा येथून श्री गणेशाचे दर्शन घेऊन मा.आ.सुरेशकुमार जेथलीया यांच्या नेतृत्वात शेतकरी व युवकाशी संवाद यात्रेला सुरवात करण्यात आली यावेळी या यात्रेला प्रतिसाद देत मोठ्या संख्येने शेतकरी व युवकांनी यात सहभाग नोंदवला. आपल्या भावाना व्यक्त करताना मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांनी पुढे म्हणाले कि खऱ्या अर्थाने लोकशाही टिकून ठेवण्याचे कार्य आजवर काँग्रेस पक्षाने केले होते. मात्र अलीकडे या दहा वर्षाच्या काळात सत्ताधाऱ्यांनी आपल्या मनमानी कारभार करत लोकशाही अडचनीत आणली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सर्वसाधारण शेतकरी, शेतमजूर व युवक वर्गासाठी धोरणात्मक निर्णय न घेतल्याने माहागाई, बेरोजगारी व नोकरबंदी असे वाईट दिवस आपल्याला पाहावा लागत आहे. हे सामीकरण बदलासाठी व विशेषकरून आपल्या मतदार संघात खरा विकास, समृद्धी व शेतकरी यांच्यासाठी राज्याच्या विविध योजना खऱ्या अर्थाने राबवण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या बाजूने मजबूत उभे रहा असे आहवन त्यांनी यावेळी केले.

यावेळी सकाळच्या सत्रात पाटोदा,येनोरा, हातडी, सोयंजना या गावी शेतकऱ्याशी व युवकांशी संवाद साधला तसेच संध्यकाळ च्या सत्रात बाबुलतारा येथे संवाद साधून युवक काँग्रेसची शाखा स्थापन करण्यात आली.तसेच यदलापूर,नांद्रा येथील शेतकऱ्यांशी व युवकांशी मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांनी संवाद साधला. शेतकरी बांधव आणि युवकांन सोबत चर्चा करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व समस्या सोडवण्यासाठी काँग्रेस पक्ष व मी पूर्ण ताकदीनिशी तुमच्या सोबत आहे असे अभिवचन त्यांनी दिले. यावेळी युवा नेते नितीन जेथलिया यांनी देखील शेतकरी व युवकांशी संवाद साधत मतदारसंघात बेरोजगार तरुणांसाठी परतूर औद्योगिक वसाहतीत उद्योग व शेत माल प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी भविष्यात प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन दिले. यावेळी सोबत काँग्रेस तालुका अध्यक्ष बाबासाहेब गाडगे, इंद्रजीतजी घनवट,शामसुंदर काळे, लक्ष्मणराव शिंदे, सुरेशजिजा सवने, मंजुळदास सोळंके, सिध्दू अंभुरे, दिलीप चव्हाण,योगेश पा.आवचार,माऊली तनपुरे,डिगबर इंगळे, प्रविण डुकरे,दत्ता अंभुरे,सचिन बोंबल, शब्बीर भाई,भरत मरळ, रूस्तुम पुंड, यश राठोड,गणेश काळे,सोमनाथ काळे,परमेश्वर बिल्लारे आदी पदाधिकाऱ्याची उपस्तिथी होती.

लोणीकर पिता-पुत्रांची काम करण्याची पध्दतिची सर्वसामान्य कष्टकऱ्यांसह अल्पसंख्यांकांनाही भुरळ!

दलीत चळवळीतील शाहूराव मुंढे यांच्यासह आष्टी येथील मुस्लिम तरुणांचा प्रवेश

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

राज्यभरात विविध निवडणुकीच्या अनुषगाने सर्वच राजकीय पक्षांकडून पक्षाचे ध्येयधोरणे समोर ठेऊन सोबतच केलेल्या विविध विकास कामांना घेऊन राजकीय नेते, लोकप्रतिनिधी गावा गावात गाठी भेटी देऊन आप आपल्या परीने आकणी करीत आहे. परतूर विधानसभा निवडणुकीत ही स्थानिक आमदार बबनराव लोणीकर यांचा झांजावात सुरूच आहे सोबतच राज्याचे भाजपाचे नवनिर्वाचित सचिव राहुल लोणीकर यांनी सुद्धा कंबर कसली असून यात मागील दहा वर्षात माजी मंत्री तथा परतूर विधानसभेचे आमदार बबनराव लोणीकर यांनी गावा गावात तांडा वस्तीवर केलेल्या विकास कामांना समोर ठेऊन पुन्हा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनाच संधीच मतदार राजा देण्याच्या तयारीत आहे. दिनांक १४ ऑगस्ट रोजी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते तालुक्यातील दलीत चळवळीतील कार्यकर्ते शाहूराव मुंढे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश यासोबतच आष्टी येथील मुस्लिम तरुणांनी मोठ्या संख्येने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्यावर विश्वास ठेऊन भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला यावेळी त्यांचे आमदार बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. दिनांक १७ ऑगस्ट रोजी आष्टी येथील तरुण वसीम राज,शेख जफर भाई, अस्लम भाई पठाण यांनी प्रवेश केला यावेळी भाजयुवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संपत टकले, भाजयुवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम सोळंके,भाजपा तालुका सरचिटणीस सुधाकर बेरगुडे,ग्राम पंचायत सदस्य सईद भाई,शाहेद भाई,आसिफ कच्छी,गणेश राऊत यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

मंठा तालुक्यातील केहाळ वडगावचे सरपंच पती बालासाहेब जनार्धन दवणे व केहाळवडगाव चे उपसरपंच भीमराव भगवानराव खरात यांनी काँग्रेस पक्षातून माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवून भारतीय जनता पक्षात पक्ष प्रवेश केला यामुळे मंठा परतूर विधानसभेत येणाऱ्या निवडणुकीत भक्कम आधार मिळणार सोबतच भारतीय जनता पक्ष व आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यामुळे पुन्हा एकदा विधानसभेवर भाजपचा झेंडा पडकणार असल्याचे संकेत मिळत आहे

पद्माकर कवडे यांच्या प्रयत्नामुळे अपंग कुटंब केशरखाने यांना १००% अनुदानावर दिला अडीच लाखाचा ईरिक्षा

आ.बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते ईरिक्षाचे केले वितरण

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या अपंग वित्त महामंडळाकडुण लोकनेते आमदार बबणराव लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मा . पदमाकर कवरे यांच्या प्रयत्नामुळे परतुर येथे रहिवासास असलेले अपंग कुटुंब बाळु केशरखाने यांच्या पत्नीला शंभर टक्के अनुदानावर उपलब्ध करून तब्बल अडीच लाखांचा ई रिक्षा महाराष्ट्र शाषण अपंग वित्त महामंडळाच्या माध्यमातून मंजुर करण्यात आला आहे . या ई रिक्षाचे वितरण परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते आमदार बबणराव लोणीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले . यावेळी आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा भाजपाचे तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे ,संचालक

तथा सामाजिक कार्यकर्ते पदमाकर कवडे , लोणी ग्रामपंयायतीचे सरपंच युवानेते गजानन लोणीकर , अपंग कुटुंबातील लाभार्थी सौ सुनिता केशरखाने , पती बाळु केशरखाने आदी मान्यवर उपस्थित होते . ई रिक्षाचे वितरण करण्यात आले नंतर त्या वाहणांची कागदपत्रे बाळु केशरखाने यांना आ बबणराव लोणीकरांनी प्रदान करूण शुभेच्छा दिल्या तसेच शाहीर पद्माकर कवडे यांनी सांगितले की , हा आपल्या परतुर तालुक्यातील पहिला ई रिक्षा वाटप करण्यात आला असुन शाषणाकडुन असे अपंग कुटुबास आपण पुन्हा ई रिक्षा पुढील काळात उपलब्ध करून देणार आहोत असल्याचे ई रिक्षाचे वितरण करताना सांगितले .

अग्रलेख...

धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याचा मार्ग प्रशस्त...

देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली. काळाच्या बरोबर जाण्यासाठी धर्मनिरपेक्ष नागरी कायदा आवश्यक आहे, यात शंका नाही. समान नागरी कायद्यासाठी मोदी यांनी यावेळी प्रथमच धर्मनिरपेक्ष नागरी कायदा हा अतिशय अचूक असा शब्द वापरला आहे. धर्मनिरपेक्ष म्हणजे सर्व धर्माच्या लोकांसाठी समान नागरी कायदा, म्हणजे कोणत्याही धर्माच्या लोकांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अन्याय होऊ न देणारा कायदा. देशातील विद्यमान कायद्याचे वर्णन मोदी यांनी सांप्रदायिक नागरी कायदा असे केले, जे अतिशय मार्मिक असे म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी समान नागरी कायद्याची आवश्यकता व्यक्त केली असल्यामुळे यावर व्यापक चर्चा झाली पाहिजे, असे आवाहन मोदी यांनी केले. त्यामुळे देशात आता समान नागरी कायदा वा मोदींच्या शब्दात सांगायचे तर धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यावर चर्चा सुरू झाली पाहिजे. चर्चेच्या मंथनातून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याचे बहुपयोगी नवनीत बाहेर आल्याशिवाय राहणार नाही. भाजपाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातून समान नागरी कायद्याचे आश्वासन वेळोवेळी दिले होते. मोदी यांनी लाल किल्ल्यावरील भाषणात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची जी आवश्यकता प्रकट केली, ती त्या दृष्टीने टाकलेले पाऊल म्हणायला हरकत नाही. धर्मनिरपेक्ष नागरी कायदा देशातील लोकांत धार्मिक आधारावर मतभेद करणार नसल्याची ग्वाही देणारा आहे. भाजपाने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम निष्प्रभ करण्यासोबत अयोध्येत राम जन्मभूमीवर राममंदिर उभारण्यासह आपल्या अनेक आश्वासनांची पूर्तता केली आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयकही संसदेत पारित केले आहे. आता फक्त समान नागरी कायदा आणि गोहत्या बंदी या दोन आश्वासनांची पूर्तता बाकी आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांत देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायदा लागू झाला तर देशवासीयांना आश्चर्य वाटणार नाही. विद्यमान कायदा देशात धर्माच्या आधारावर विभाजन करतो, समाजात श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव करतो, असा आरोप मोदी यांनी केला; जो कोणालाच नाकारता येणार नाही. यासाठी काँग्रेस जबाबदार आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून १९७७ चा अपवाद वगळता देशात काँग्रेसचे सरकार होते. २०१४ पासून २०२४ पर्यंतही गैरकाँग्रेसी सरकार देशात सत्तारूढ आहे. ढोबळमानाने विचार केला तर स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांपैकी जवळपास ६३ वर्षे देशात काँग्रेसचे सरकार होते. काँग्रेसने आपल्या राजकीय फायद्यासाठी बहुसंख्यकांवर अन्याय करत अल्पसंख्यकांचे लांगूलचालन केले, याचा सारा देश साक्षी आहे. काँग्रेसने आपल्या याच भूमिकेमुळे धार्मिक आधारावर ध्रुवीकरण करत देशाचे अपरिमित नुकसान केले, यात शंका नाही. कोणतेही सरकार पालक या भूमिकेत असते वा त्याने तसे असावे, असे अपेक्षित असते. ज्याप्रमाणे कोणतेही पालक आपल्या दोन मुलांत कोणताही भेदभाव करत नाही, त्याचप्रमाणे सरकारने देशातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना भेदभाव न करता सारख्या ममत्वाने वागवणे अपेक्षित असते. पण काँग्रेसने मतांच्या राजकारणासाठी असे कधी केल्याचे दिसले नाही. अल्पसंख्यकांचे लाड करूनच काँग्रेस थांबली नाही तर तिने बहुसंख्यकांवर अन्यायही केला. म्हणजे बहुसंख्यकांच्या हातातील घास हिसकावत तो अल्पसंख्यकांच्या हातात दिला. यामुळे काँग्रेसने जाणीवपूर्वक आपल्यावर अन्याय केल्याची भावना बहुसंख्यकांमध्ये निर्माण झाली, ज्याचे राजकीय नुकसान काँग्रेसला सहन करावे लागले. पण यानंतरही काँग्रेसचे डोळे उघडले नाही. गाढ झोपेत असलेल्याला जागे करणे सोपे असते, पण झोपेचे सोंग घेतलेल्याला झोपेतून जागे करणे कठीण असते; तशीच स्थिती काँग्रेसची झाली आहे.

मोदी यांनी आपल्या जवळपास ९८ मिनिटांच्या भाषणातून राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक मुद्यांना स्पर्श केला आहे. 'वन नेशन वन पोल'ची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. देशातील विकासाचे चक्र अव्याहत फिरत ठेवण्यासाठी सर्व प्रकारच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या गेल्या पाहिजेत. आपल्या देशात वर्षातील ३६५ दिवसही कोणत्या न कोणत्या निवडणुका सुरू असतात आणि त्यामुळे देशाच्या वेगवेगळ्या भागात आचारसंहिता लागू असते. निवडणूक आचारसंहितेमुळे देशातील विकासाची कामे ठप्प आणि प्रभावित होत असतात. मोदींनी आपल्या भाषणात घराणेशाही आणि जातीयवादावरही जोरदार हल्ला चढवला आहे. देशात काँग्रेसच्या विशेषत: गांधी कुटुंबाच्या घराणेशाहीला देश विटला आहे. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वढेरापर्यंत या घराणेशाहीची पाळेमुळे पोहोचली आहे. राहुल गांधींनी लग्न न केल्यामुळे उद्या गांधी-नेहरू घराण्याचे वारस म्हणून प्रियांका वढेरा यांची मुलंही राजकारणात आली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. याच घराणेशाहीवर मोदी यांचा आक्षेप आणि नाराजी आहे. कोलकात्यात एका वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरवर झालेल्या निर्घृण बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा थेट उल्लेख मोदी यांनी आपल्या भाषणात केला नसला, तरी महिलांवरील वाढत्या अन्याय आणि अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणाचा तातडीने तपास होण्याची तसेच यातील दोषींना कठोर शिक्षा होण्याची जी आवश्यकता मोदी यांनी व्यक्त केली, ती अतिशय योग्य अशी आहे. कोलकात्यातील डॉक्टरवरील बलात्काराचे आणि हत्येचे प्रकरण संबंधित वैद्यकीय महाविद्यालयाने तसेच पश्चिम बंगाल पोलिसांनीही अतिशय बेजबाबदारपणे हाताळले, असे नाईलाजाने आणि व्यथित अंत:करणाने म्हणावेसे वाटते. या दोघांच्याही भूमिका दोषीला पकडून कठोरातील कठोर शिक्षा करण्याऐवजी त्याची पाठराखण करण्याची असल्याचे तपासाच्या घटनाक्रमावरून दिसून येते.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील सरकारची भूमिकाही या प्रकरणात कोणाला तरी वाचवण्याची असल्याचे जाणवते, त्यामुळेच कोलकाता उच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल पोलिसांच्या तपासावर नाराजी व्यक्त करत तपास सीबीआयकडे सोपवला आहे. लाल किल्ल्यावरून सलग ११ वेळा तिरंगा फडकवत मोदी यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचा विक्रम मोडला आहे. मनमोहनसिंग यांनी १० वेळा लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकवला होता. लाल किल्ल्यावरून सर्वाधिक म्हणजे सलग १७ वेळा तिरंगा फडकवण्याचा बहुमान देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना मिळाला आहे. दुसऱ्या स्थानावर त्यांच्याच कन्या आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आहे. गांधी यांनी १६ वेळा लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकवला. इंदिरा गांधी आणि पंडित नेहरू यांचा विक्रम मोदी यांना मोडता येईल का, हे येणारा काळच सांगणार आहे. मात्र, बापलेकीचा हा विक्रम मोदी यांनी मोडावा, अशी समस्त देशवासीयांची इच्छा असू शकते. कोणताही समारंभ कसा साजरा करावा, हे सांगण्याची मोदी यांची एक पद्धत आहे. यावेळच्या लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यासाठीही मोदी यांनी समाजाच्या वेगवेगळ्या वर्गातील काही लोकांना आमंत्रित केले. यात पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील पदकविजेते होते, त्याचप्रमाणे आशा वर्कर, लखपती दीदी, ड्रोन दीदी तसेच केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभार्थीही होते. मोदी यांनी देशातील राजकारणाचा चेहरामोहरा बदलवला आहे. जगात भारताला मानाचे स्थान मिळवून दिले. अविकसित तर सोडा, पण विकसित देशांचे प्रमुखही पंतप्रधान मोदी यांच्या विकासाभिमुख आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वाचे चाहते झाले आहेत. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला भलेही कमी पदके मिळाली असतील, एकही सुवर्णपदक मिळाले नसेल; मात्र जागतिक नेत्यांची कोणत्याही गटातील लोकप्रियतेबाबत ऑलिम्पिक स्पर्धा झाली तर त्यात सर्वाधिक सुवर्णपदके मोदी यांनाच मिळतील, यात शंका नाही. ■

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

टवाळा आवडे स्टॅण्डअप कॉमेडी!

सध्या 'मनोरंजन' या शब्दाचा अर्थ हरवलेला आहे. लोकांना वाटतं की, केवळ विनोद म्हणजेच मनोरंजन. पण मी स्वतः कला क्षेत्राशी संबंधित असल्याने हे नक्कीच सांगू शकतो की, विनोद हा मनोरंजनाचा फक्त एक प्रकार आहे. तुमच्या कलाकृतीने प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणलं, तुम्ही प्रेक्षकांना भावुक केलं, त्यांना घाबरवलं तरी तुम्ही त्यांचं मनोरंजन केलं असंच म्हणावं लागेल. त्यामुळे केवळ हसवणं म्हणजे मनोरंजन करणे नव्हे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. कोणतीही कला असली तरी त्यात अनेक मर्यादा येतात. विशेषतः विनोद निर्मिती करणं सोपं काम नाही. चार्ली चॅप्लिन या महान कलाकाराने विनोद निर्मितीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं आहे. पु. ल. देशपांडे, राम नगरकर हे मराठीतले दिग्गज. राम नगरकर यांच्या 'रामनगरी' या पुस्तकातलं पहिलं पान तुम्ही वाचायला सुरुवात करता तेव्हा तुमच्या ओठांवर जे स्मित फुललेलं असतं, ते शेवटच्या पानापर्यंत टिकून राहतं. ही त्यांच्या लिखाणाची किमया आहे. आपलं दुःख सांगताना माणूस समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर स्मित फुलवू शकतो, हे केवळ अद्‌भुत आहे. पु. ल. देशपांडे म्हणजे आजच्या भाषेत सांगायचं झालं तर स्टॅण्डअप कॉमेडियन. एक व्यक्ती समोर उभी राहून लोकांना हसवते, अशी स्टॅण्डअप कॉमेडीची साधी सोपी व्याख्या सांगता येईल. रॉवन टकिन्सन यांची स्टॅण्डअप कॉमेडी कल्पनांच्या पलीकडची असते. रॉवन तुम्हाला विनोदाच्या एक वेगळ्या दुनियेत घेऊन जातात. कधी कधी मला वाटतं की, विनोद हा रॉवन टकिन्सन यांच्या हुकुमाचा गुलाम आहे की काय! कारण ते अगदी साध्या साध्या गोष्टीतूनही विनोद निर्माण करतात.

मात्र घरात उंदरांचा सुळसुळाट होतो, तसा आता स्टॅण्डअप कॉमेडियन्सचा सुळसुळाट झाला आहे. मग हे लोक आपण जे करतो, त्याला विनोद समजू लागतात. कारण त्यांच्यासमोर बसलेले प्रेक्षक याच जमातीतील असल्यामुळे त्यांना भरभरून दाद देतात. सध्या शिव्या दिल्या तरी तो विनोद आहे, असं समजण्याचा प्रघात आहे. बिग बॉसचा विजेता मुनव्वर फारुकी हे त्यातलंच एक प्रकरण. मुनव्वर हा स्वतःला रॅपर आणि स्टॅण्डअप कॉमेडियन म्हणवून घेतो. मुनव्वर हा त्याच्या थुकरट विनोदामुळे, अनेक मुलींसोबत असलेल्या त्याच्या संबंधांमुळे नेहमीच नकारात्मकरीत्या चर्चेत असतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुनव्वरने बिग बॉस जिंकल्यावर हजारो लोक याच्या स्वागतासाठी जमले होते. अहो बिग बॉस हा काही कौशल्य दाखवण्याचा कार्यक्रम आहे का? नृत्य, गायन, अभिनय अशी एखादी कला तिथे सादर केली जाते का? ऑलिम्पिक मेडलपेक्षा महत्त्वाचे आहे का? बिग बॉसमध्ये अतिशय थुकरट आणि वाह्यात गोष्टी केल्यानंतर इतकं जंगी स्वागत? म्हणजे मुनव्वर फारुकी आणि त्याच्या चाहत्यांचा मेंदू गुडघ्यात नव्हे तर तळव्यात आहे, असं म्हणावं लागेल. या मुनव्वरने हल्लीच एका स्टॅण्डअप कॉमेडीच्या कार्यक्रमात कोकणी माणसाला शिवी दिली आणि थट्टा केली. नितेश राणे यांनी मुनव्वरला चांगलाच दम भरला. त्यानंतर त्याने लाईव्ह येऊन जाहीर माफी मागितली. विनोद करण्यासाठी त्याला शिव्यांची गरज पडते? पुलंनी मुंबईकर, पुणेकर यांच्या गमती सांगितलेल्या आहेत. पुलंचे व्हिडीओ पाहताना आजही आपल्याला काही अपमानास्पद वाटत नाही. उलट आपल्याला आनंदच मिळतो. निखळ आनंद! अहो यालाच तर विनोद म्हणतात ना! फालतू बडबडीला आपण विनोद म्हणायला लागलो तर कसं चालेल?

समर्थ रामदास म्हणतात,

टवाळा आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद ।
तामसास अप्रमाद । गोड वाटे॥

याचा अर्थ ज्यांना ज्यांना विनोद आवडतो ते सगळेच टवाळ असतात, असं रामदासांना म्हणायचं नाही. उन्मत्त माणसाला छंद आवडतात. तामसी माणूस शांत बसू शकत नाही. तो सतत घोटाळे करत असतो. त्याचप्रमाणे टवाळ माणसाला उठता बसता विनोद करायला आवडतो, असं रामदास म्हणतात. समर्थांनाही विनोदाचे वावडे नव्हते. २४ वर्षांनंतर आईला गावी भेटायला गेल्यावर आई त्यांना म्हणाली, 'तू इतकी वर्षे बाहेर होतास. तुला खरोखर एका भयानक भुताने पछाडलेले होते, असे वाटते.' समर्थांचा मिश्कील स्वभाव बघा. समर्थ आईला गमतीने म्हणतात, 'हो, मला भुतानेच पछाडले होते.'

होते वैकुंठीचे कोनी । शिरले अयोध्या भुवनी ।
लागे कौसल्येचे स्तनी । तेचि भूत गे माया॥

प्रभू श्रीरामचंद्रांनी ओळख समर्थ इतक्या मिश्कीलपणे आईला करून देतात. म्हणजे 'टवाळा आवडे विनोद' असं म्हणणाऱ्या रामदासांना विनोदाचे वावडे नव्हते तर वाह्यात बडबडीला, इतरांचा अपमान करण्यात समाधान मानणाऱ्या टवाळखोरांसाठी हे वाक्य होतं. आज जर समर्थ रामदास असते तर नक्कीच टवाळा आवडे स्टॅण्डअप कॉमेडी, असं म्हणाले असते. कारण हे लोक टवाळखोरच आहेत. याआधी या मुनव्वर नावाच्या टवाळाने प्रभू श्रीरामचंद्र आणि माता सीतेवर गलिच्छ विनोद केला होता. हा मुनव्वर त्याच्या धर्मातल्या प्रतीकांवर विनोद करू शकतो का? आणि जर करू शकत नसेल तर हिंदू धर्म हा काय यांच्या मनोरंजनाचं साधन आहे का? मला प्रश्न पडतो की, समोर बसलेल्या प्रेक्षकांना भावना, स्वाभिमान काही नसतं का? आपल्या देवाधर्मावर कुणी वाह्यात विनोद करत असेल तर त्याला तिथल्या तिथे थांबवलं पाहिजे. त्याचा प्रतिकार केला पाहिजे. कलाकाराला इतरांच्या भावना दुखावण्याचा अधिकार नाही आणि याला जर अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणायचे असेल तर यांना स्वातंत्र्याचा अर्थ कळलेला नाही. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी घेणे, जबाबदारी नाकारून उथळपणे वागणे नव्हे. त्यामुळे या लोकांना विनोद म्हणजे काय हेच कळलेलं नाही. विनोदी लेखनामागचा हेतू सांगताना पु. ल. देशपांडे म्हणतात, दाढी गुळगुळीत व्हावी, पण ती करताना जखम होऊ नये. ज्याची दाढी झाली, त्याला स्वच्छ झाल्यासारखं वाटावं...! ■

writerjayeshmestry@gmail.com

वेध

प्रफुल्ल क. व्यास

लाजिरवाणेच...

जे देशासाठी लढले ते अमर हुतात्मे झाले, हे वाक्य इयत्ता तिसरी, चौथीत शिकवले गेले आणि आजही ते जवळपास प्रत्येकाच्या ध्यानात असायलाच हवे! काल स्वातंत्र्यदिनी एका हिंदी वाहिनीने 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट दाखवला. पाहणाऱ्यांच्या अंगावर शहारे आले नसतील तर त्यांच्या धमन्यांमध्ये हिंदुत्वाचा रक्तपुरवठा कमी असेल, असेच म्हणावे लागेल. स्वत:च्या स्वार्थासाठी इतिहासाचा विपर्यास केलाही गेला असेल. पण, आपण जे आज उपभोगतो आहोत त्यासाठी त्यांनी काय काय नाही भोगले तेव्हा कुठे आज आपण स्वातंत्र्यदिन साजरा करू शकतो. पण, त्याची जाण १०० गुणांच्या उत्तर पत्रिकेपर्यंत किंवा 'हिस्ट्री' या विषयात पीएच. डी. म्हणजे नोकरीचे कन्फर्मेशन! याशिवाय तो इतिहास आता इतिहासजमा होण्याची वेळ आली आहे. आम्हाला स्वातंत्र्य मिळाले आणि आम्ही आता ते स्वैराचाराकडे नेतो आहोत. अगदी हा देश ज्या संविधानावर चालतो आहे तेही बदलवण्यात येणार असल्याची कोल्हेकुई करण्यात आली. अरे, आजपर्यंत त्यात काळपरत्वे सुधारणा झाल्या. त्या पुढेही होत राहतील. पण, या स्वातंत्र्याने दिलेल्या हक्काचा वापर आता आम्ही आमच्या देशासाठी नव्हे तर जात, पात, धर्मासाठी करतो आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला याचा विचार तर केलाच जात नाही. परंतु, स्वातंत्र्य मिळवणे ही त्यांची वैयक्तिक गरज होती, असा आविर्भाव सध्या समाजात पसरवला जात आहे. अगदी, ते लढलेच नाहीतपासून ते माफीवीर होतेपर्यंतचे राजकारण होते तेव्हा याचसाठी होता अट्टहास असेच काहीसे म्हणावे लागेल. ज्या संविधानाच्या भरवशावर आमचा देश चालतो आहे, त्याला खीळ घालण्याचे कर्मही 'लोकप्रतिनिधी ते लोकसेवक' करत आहेत. वेतन प्रत्येक नोकरदाराची गरज आहे. त्याला ते मिळालेच पाहिजे. परंतु, कमी काम आणि रग्गड वेतनाचेही अधिकारी जेव्हा वेतनवाढीसाठी संप पुकारत शासन, सामान्य नागरिकांना वेठीस धरतात तेव्हा याचसाठी स्वातंत्र्य मिळवले का असा प्रश्न विचारला जातो. अहो, याहीपेक्षा निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांची कहाणी आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात हर घर तिरंगा अभियानाचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. प्रशासनाने त्याचा अध्यादेश ग्रामपंचायतपर्यंत पाठवला. परंतु, वर्धा जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयापर्यंत तो संदेशच पोहोचला नव्हता. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कार्यालयांवर, शासकीय ग्रंथालयावर १३ ऑगस्ट रोजी झेंडा फडकलाच नव्हता. ही झाली शासनाच्या जावयांची कथा! त्यांना जास्तीत जास्त कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल. याशिवाय दुसऱ्या शिक्षेची तरतूद असेलही. पण, त्यांच्यासोबत संघटना जुळून आहेत. कारवाईचे संकेत येताच संघटनांकडून स्वातंत्र्यातून मिळालेल्या अधिकाराचा वापर केला जाईल! याशिवाय काहीच होणार नाही, हे पक्के! आम्ही १५ ऑगस्टला स्वातंत्र्य आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताकदिन साजरा करतो. मात्र, या दोन्ही तारखांना लागून शनिवार, रविवार वा अन्य सुट्ट्या येतात का याचा विचार करून पर्यटनाचे नियोजन आखतो. झेंडावंदनाला बुट्टी मारण्याची तयारी करतात तेव्हा याचसाठी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले का असा प्रश्न विचारावासा वाटतो. आमचा देश युवांचा आहे. इतर देश वार्धक्याकडे वळत असताना आम्ही तरुण भारताचे नागरिक आहोत, हे आम्ही जेव्हा समजून घेतो तेव्हा परवा १५ रोजी आमच्या युवकांनी घातलेला नंगा नाच पाहून लाजिरवाणे वाटू लागले! अंगविक्षेप, वाहनांचे कर्कश आवाज, 'जहाँ डाल डाल पे सोने की चिडीयाँ' ते सैराटपर्यंतचे डिजेवर वाजत असलेले गाणे... आकंठ रिचवून झाल्यानंतर घरी जाण्याचे भानही नसणारे युवक पाहून आम्ही स्वातंत्र्यदिन फक्त झेंडावंदनापर्यंतच मर्यादित ठेवले का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. आमच्या पिढीला स्वातंत्र्यासोबत काही देणेघेणे नाही. स्वैराचार हवा आहे. कोणाचीही बंधनं नको आहेत. स्वातंत्र्याचा स्वैराचार मेट्रोसिटीतून लहान शहारांपर्यंतही पोहोचला आहे. याची चिंता आता कोणी, कोणासाठी करावी. कारण, हा देश आता फक्त राजकारणासाठी जातिपातीत विभागण्याचे महापाप सुरू असून त्याला आमची ही पिढी बळी पडते आहे. कारण, त्याला खरा इतिहास शिकवल्याच गेला नाही. आजही आमच्या पुढे गरिबी, बेरोजगारी, सामाजिक दरी हे प्रश्न आहेत. त्यासाठी आम्हाला एकत्र यावे लागेल. त्याशिवाय आमचे स्वातंत्र्य अपूर्ण आहे. परंतु, आमची पिढी स्वातंत्र्यदिनी दुपारनंतर एकत्र येते ती 'एकच प्याला'साठी लाज वाटते हे सर्व पाहून!

शेवटी...

'दिलों की धडकन, वतन की शान हो तुम, तिरंगे की आन-बान और शान हो तुम' असे म्हणताना अंगावर तिरंगा, वाहनांवर त्रिपल सीट, वाहतुकीच्या नियमांना धाब्यावर बसवत सुसाट धाब्यावर जाणारी वाहनं पाहून याचसाठी हवे होते का स्वातंत्र्य असे म्हणावेसे वाटते. बघा, प्रजासत्ताकदिन तरी लाजिरवाणा होऊ नये याचे नियोजन करा. ■

९८८१९०३७६५

मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

समय बड़ा बेढंगा, आज आदमी बना लफंगा!

महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या नव्हे, प्रामुख्यानं उद्धव ठाकरेंच्या वैचारिक दिवाळखोरीला बघितल्यानंतर 'नास्तिक' या जुन्या चित्रपटातील गीताची आपसूक आठवण होते. सुमारे ६०-६५ वर्षांपूर्वी आजच्या मनुष्यविकृतीची तंतोतंत भविष्यवाणीच या गीताच्या गीतकाराने केली आहे, असे म्हणायला हरकत नाही.

त्यातील काही बोल आजच्या महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांच्या प्रवृत्तीला उद्‌धृत करतात.

देख तेरे संसार की हालत क्या हो गयी भगवान,
कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान,
सूरज ना बदला, चाँद ना बदला, ना बदला रे आसमान,
कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥
आया समय बड़ा बेढंगा, आज आदमी बना लफंगा,
कहीं पे झगड़ा, कहीं पे दंगा, नाच रहा नर होकर नंगा,
छल और कपट के हांथों अपना बेच रहा ईमान,
कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥
राम के भक्त, रहीम के बन्दे, रचते आज फरेब के फंदे,
कितने ये मक्कार ये अंधे, देख लिए इनके भी धंधे,
इन्हीं की काली करतूतों से हुआ ये मुल्क मशान,
कितना बदल गया इन्सान... कितना बदल गया इन्सान ॥

राजकारणासाठी, आपल्या राजकीय स्वार्थासाठी, सत्तापदांच्या हव्यासापोटी, राजकीय व्यक्तींनी माणुसकी सोडून जी खालची पातळी गाठली आहे, त्याचे हुबेहूब वर्णन या गीतातून करण्यात आले आहे. विश्वंभर चौधरी नामक तथाकथित समाजसेवक कम राजकारण्याने नुकतेच यांच्यासाठी देशात केवळ सत्तेच्या हव्यासापोटी किती नीच मनुष्य जमात तयार केली गेली, अशा शब्दातील ट्विट करून या प्रवृत्तींची त्यांच्या शैलीत प्रशंसा केली आहे.

अलिकडल्या काळातील उद्धव ठाकरेंची भूमिका, वक्तव्ये बघितली तर खरोखर 'छल और कपट के हांथों अपना बेच रहा ईमान, कितना बदल गया इन्सान...' हे शब्द लागू होताना दिसत आहेत. दिल्ली समोर मुजरा करणार नाही, महाराष्ट्र दिल्ली समोर झुकणार नाही, महाराष्ट्र दिल्लीच्या इशाऱ्यावर चालणार नाही, दिल्लीच्या हुकूमशाहीविरुद्ध झुकणार नाही, वाकणार नाही, अशा अनेक वल्गना उद्धव ठाकरे, त्यांचे चेलेचपाटे करत आले आणि करत असतात. आज तर, 'कितना बदल गया इन्सान'चे मूर्तिमंत उदाहरण उद्धव ठाकरेंनी मुंबईच्या कार्यकर्ता मेळाव्याप्रसंगी दिले. मुख्यमंत्रिपदाच्या हव्यासापोटी गद्दारी करत हिंदुत्वाची कास सोडत, २५ वर्षे जुनी युती तोडणारे उद्धव ठाकरे आज काँग्रेसनं आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, मी त्याला बिनशर्त पाठिंबा देईल, असे आश्वासन दिले. हीच समजदारी जर २०१९ ला दाखवत, हेच शब्द भाजपाला म्हटले असते तर नीलाम झालेली, चव्हाट्यावर आलेली अब्रू वाचली असती; झाकली मूठ राहिली असती! 'घर का ना घाट का' झाले नसते, इटलीच्या मॅडमपुढे मुजरा घालावा लागला नसता, दिल्लीपुढे झुकावे लागले नसते, मुख्यमंत्रिपदासाठी अशी घालमेल नसती, शिवसैनिकच मुख्यमंत्री करेल असे छातीठोक सांगण्याचे धाडस असते, जाहीर सभांमधून शिवसेनेचाच मुख्यमंत्री करू, भगवा फडकवू म्हणता आले असते, नाही का?

बरं; मातोश्रीमधील बाळासाहेबांची खोली ही आमच्यासाठी मंदिर आहे, त्या मंदिरात दिलेला शब्द भाजपाने पाळला नाही, असे वारंवार सांगितले गेले. आजवर या तुमच्या मंदिरात येऊन भाजपाचे लोकं प्रत्येक वाटाघाटी करत आले, शब्द देत आलेत. त्यांनीही नेहमी बाळासाहेबांचा आदरच केला. मात्र, या लोकसभेवेळी तर मविआतील घटक पक्षाचा कोणताही नेता या मंदिराकडे फिरकला नाही. ढुंकून पाहिलं नाही. येत्या विधानसभेच्या निमित्ताने तरी या पवित्र मंदिरात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते नतमस्तक होतील का? म्हणतात ना आधीच ठोकर लागली असेल तर दुसऱ्यांदा माणूस ताकही फुंकून पितो. मग उद्धव ठाकरेला भाजपाकडून दगाफटका मिळाल्यानंतर, पुन्हा दगाफटका होऊ नये म्हणून, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून वचन घेतले आहे का? नसेल तर कधी घेणार आहेत? या मंदिरात आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाची चर्चा करतील आणि निम्मे निम्मे वर्ष मुख्यमंत्रिपद विभागून देण्याचा शब्द सहकारी पक्षाचे नेते देतील? हा शब्द उद्धव ठाकरे आघाडीतील घटक पक्षांकडून घेणार आहेत की नाही? 'चर्चा करायची असेल तर मातोश्रीवर या' असे कधी खडसावतील? २५ वर्षे जुन्या मित्रावर विश्वास न ठेवता शब्द घेतला होता; मग जुम्माजुम्मा चार दिवसांच्या जवळीक करणाऱ्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवणार आहात का? त्यामागे काय लॉजिक आहे तुमचं? निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदाचं ठरवू अशी तुमची आजची भूमिका असेल तर हे मनपरिवर्तन कसे काय झाले? हीच उच्च विचारसरणी २०१९ मध्ये कुठे गेली होती? त्यावेळी कोती मनोवृत्ती का दाखविली? अशा अनेक प्रश्नांची उत्तरं आधी या महाराष्ट्राला द्यावी लागणार आहे उद्धव ठाकरेंना... नाहीतर 'समय बड़ा बेढंगा' असल्याने, महाराष्ट्रातील जनता 'आदमी बना लफंगा' म्हणाल्याशिवाय राहणार नाही.

काँग्रेसचा ढोंगीपणा : लाडकी योजना आणली, पण द्यायला पैसे कुठे आहे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. १५०० रुपयांनी विकत घ्यायला आमचं बहिणींचं तकलाद् प्रेम नाही. १५०० रुपये देऊन नात्याचा अपमान केला आहे, असे खासदार सुप्रिया सुळे म्हणत आहेत. १९९ कोटी रुपयांचा खर्च कशासाठी असा आक्षेप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी घेतला आहे. वडेट्टीवार आज बोलले, पण काँग्रेसचा या योजनेला पहिलेपासून विरोध आहे. राज्याचे काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आबा बागुल यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चुनावी जुमला आहे, फसवी आहे, ही योजना राबविणे राज्याच्या हिताचे नसल्याने ती तातडीने रद्द करा अन्यथा न्यायालयात जाऊ, असा इशारा दिला होता. प्रत्यक्षात ही योजना फसवी आणि राज्याच्या हिताची नसेल तर काँग्रेस आणि समविचारी पक्षांच्या आमदारांनी आपल्या मतदारसंघात ही योजना राबविली जाऊ नये, या फसव्या योजनेचा लाभ महिलांनी घेऊ नये, असे आवाहन महिलांना करण्याऐवजी आपल्या कार्यालयासमोर मोठमोठे लाडकी बहीण योजनेचे फलक लावून कार्यालयात फॉर्म भरून घेत आहेत. जे वडेट्टीवार आज या योजनेला विरोध करत आहेत, त्यांचे कार्यकर्तेदेखील या योजनेचे फॉर्म भरत आहेत. लोकसभेत खटाखट योजनेचे फॉर्मदेखील याच वडेट्टीवारांनी भरून घेतले होते. खटाखट पैसे देण्याचे आश्वासन फसवे नाही आणि जे प्रत्यक्षात दिले जात आहे, ते मात्र फसवे? वारे काँग्रेसचे पुरोगामी लॉजिक... ज्या योजनेला आपला विरोध आहे, जी योजना फसवी आहे, त्या योजनेचा लाभ आपल्या मतदार क्षेत्रातील तमाम महिलांनी किंबहुना काँग्रेसला मानणाऱ्या महिलांनी तरी घेऊ नये, असे आवाहन का केले जात नाही आहे? कारण मतांचं राजकारण... दुसरीकडे महिलांच्या हिताच्या या योजनेला आपल्या राजकीय स्वार्थासाठी फक्त बदनाम करण्याचा धंदा चालवला आहे. बरं; झारखंड सरकारने 'मुख्यमंत्री लाडली मंईया योजना' सुरू केली आहे. १००० रुपये प्रत्येक महिलेला दिले जात आहे. येथील सरकार आघाडीतील झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाचे आहे. महसुली, राजकोषीय तूट असलेली झारखंडची अर्थव्यवस्था असून राज्यावर कर्जाचा डोंगर असताना चालविलेल्या या योजनेला काँग्रेसने विरोध केला आहे का? महाराष्ट्र सरकारला दिले जात असलेले ज्ञानाचे डोज काँग्रेसने आपल्या सहकारी पक्षाला पाजले नाही का? काँग्रेसचा ढोंगीपणा या निमित्ताने आता उघडा पडला आहे. ■

९२७०३३३८८६

बलात्काऱ्याचा चौरंगा करा

दिल्लीमध्

संक्षिप्त वृत्त...

श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था खसगी येथे ध्वजारोहण व ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न

उमरगा, दि.१७ ऑगस्ट -

सिध्देश्वर विद्यालय खसगी येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. दि.१५ ऑगस्ट रोजी भारत देशाच्या ७८ वा स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापना निमित्त श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी तसेच स्वातंत्र्य सेनानी चंद्रशेखर बदोले उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले यांच्या हस्ते प्रशालेत ध्वजारोहण व ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या शेवटच्या टोकावर ती वसलेल्या कसगी गावात स्वातंत्र्योत्तर काळात सन १९५४ साली या शिक्षणा संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. येत्या २०२९ साली याच संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरी करणारी ही तालुक्यातील तिसऱ्या क्रमांकाची संस्था आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.विठ्ठलराव पटणे उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी गावातील विविध संस्थेचे प्रमुख माता-पालक विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक बांधव उपस्थित होते.

रेल्वे भुसंपादनमधील सुधारीत पुरवणी अवार्ड जाहीर करुन वाढीव मावेजा द्यावा

तुळजापूर तालुक्यातील तडवळा येथील शेतकऱ्यांची मागणी

तभा वृत्तसेवा

तुळजापूर, दि.१७ ऑगस्ट -

सोलापुर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे भुसंपादन होणाऱ्या जमीनीपैकी तडवळा (ता. तुळजापूर) येथील आवार्डमध्ये प्रचंड चुका होवुन यात शेतकऱ्यांना मोठा अर्थिक फटका बसला असुन झालेल्या चुका दुरुस्त करुन सुधारीत पुरवणी अवार्ड जाहिर करुन वाढीव मावेजा द्यावा, अशी मागणी तडवळा (ता. तुळजापूर) येथील रेल्वे भुसंपादनमधील सर्व शेतकरी व ग्रामस्थांनी भूसंपादन अधिकारी संजय ढवळे यांना निवेदन देवुन केली आहे.

विकास तिर्थक्षेत्रचा उद्धस्त बळीराजा होत असल्याने या प्रकरणाची तात्काळ केंद्र राज्य खासदार, आमदार यांनी लक्ष घालुन शेतकऱ्यांना समाधानकारक मावेजा देण्याची मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. निवेदनात म्हटलं आहे कि, तडवळा (ता. तुळजापूर) येथील सर्व शेतकरी, भुधारक रहिवाशी असुन सदर रेल्वे मार्गासाठी भुसंपादन होणाऱ्या सर्व शेतकरी, भुधारक यांना तलाठी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नोटीसमध्ये वेगवेगळया शेतकरी, भुधारकांच्या मावेजामध्ये खुप मोठया प्रमाणात तफावत असुन, आम्ही सर्व शेतकऱ्यामध्ये भुधारक रहिवाशीमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली आहे.

धाराशिव रेल्वेसाठी भुसंपादन होत असलेल्या जमीनीतील शेतजमीन यापुर्वी सोलापूर-धाराशिव-लातुर या बायपास मार्गात ही भुसंपादन झालेली असुन यातील बहुतांशी शेतकरी भुमीहीन होणार आहे. तसेच सदर बायपास मार्गालगत असलेल्या जमीनी ही रेल्वे मार्गासाठी भुसंपादन होत आहे. त्यामुळे भुसंपादन होणाऱ्या शेतकऱ्यांकडील उत्पादनाचा मार्ग बंद होवून भविष्यात उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच तडवळा येथील झोपडपट्टी येथे जवळपास शंभरावर प्लॉट धारक घरे आहेत. सदरील घरे प्लॉट रेल्वे मार्गात भुसंपादन झाली आहे. त्याबदल्यात भुसंपादन अधिकारी, रेल्वे प्रशासनाने नोटीसद्वारे जाहिर केलेला मोबदला हा अनेकांची कुटुंब उघडयावर आणणार आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमीनी हायवेलगत असताना त्याना हायवेचा मोबदला देण्यात आलेला नाही. तसेच कांही शेतकऱ्यांच्या जमीनी बागायत असताना जिरायत लावल्या आहेत. आम च्या जमीनी श्री तुळजाभवानी मंदिरापासुन दीड ते दोन किलोमीटर अंतरावर आहेत. तसेच सदरील जमीनी हया संभाव्य अकृषी क्षमतेच्या आहेत. त्यामुळे त्यांना मावेजा कमी मिळाला आहे.

कांही शेतकऱ्यांना ग्रामीण गुणक घटक २ असताना १ गुणक झाला व हयाची जमीन बागायत असताना त्यांना जिरायत धरुन चारपट मावेजा देण्यात आला नाही. तसेच गावातील शंभर घरे रेल्वेत संपादीत होत असताना त्यांचे कुटूंब उध्दवस्त होत असताना त्यांना जागेचा मावेजा गावठाणातील देण्यात आला नाही. कांही शेतकऱ्यांना फळझाडे, बोअरवेल, बांधकाम, पाईपालाईन, विहिर असताना त्यांच्या नोंदी आवार्डमध्ये आलेल्या नाहीत त्या घेण्यात याव्यात. तसेच गावातील १०० घरे रेल्वेत विस्थापीत होत असताना त्याच प्लॉटचे तहसिलचे अकृषी असताना त्यांना जमीन म्हणुन जिरायत दाखवुन गुंठयाचा ४० हजार रूपये गुंठा भाव दिला आहे. त्याची खरेदी रजिष्ट्री ऑफीसमधून ४ लाख रू. प्रमाणे घेतला आहे.

काही शेतकऱ्यांना जमीन संपादन होत असताना त्यांना नोटीस देण्यात आली नाही व काही शेतकऱ्यांना गटात आदला बदल करून जमीन दाखवण्यात आली आहे. ही झालेल्या अवार्डमधील चुका दुरुस्त करुन सुधारीत आवार्ड जाहिर करुन मावेजा देण्यात यावा अशी विनंती केली आहे. याची दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरुन आंदोलन करावे लागेल अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातुन व्यक्त केल्या जात आहेत.

या निवेदनावर तडवळा (ता. तुळजापूर) येथील रेल्वे संपादीत शेतकरी व ग्रामस्थांचा स्वाक्षरी आहेत.

भोसले हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.१७ ऑगस्ट-

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार रामराव नन्नवरे

व मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर राष्ट्रगीत, ध्वजगीत, महाराष्ट्र राज्य गीत झाले त्यानंतर एन. सी.सी.कॅडेट व स्काऊट गाईड-रेंजर्स रोवर या चमूने राष्ट्रध्वज व मान्यवरांना मानवंदना दिली.

विविध स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी बक्षीस वितरण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्र भक्तीपर गीतांचे गायन प्रशालेतील संगीत शिक्षक महेश पाटील व त्यांच्या बालचमूने सादर केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, कार्यकारी अधिकारी तथा संस्था संचालक आदित्य पाटील, एम.के.सील.चे जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त वाय.के.पठाण, संस्था संचालक पी.एल.गाडे,

अरुण बोबडे तसेच इतर सेवानिवृत्त शिक्षक व संस्था संचालक संतोष कुलकर्णी, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक वाय.के.इंगळे, सुनील कोरडे, बी.बी.गुंड, आर.बी. जाधव, एन.एन.गोरे, धनंजय देशमुख, प्रा.विनोद आंबेवाडीकर यांच्यासह अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने विद्यार्थी-पालक यावेळी उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.सी.पाटील यांनी केले तर कलाशिक्षक एस.डी.वाघ, शिवाजी भोसले, सुरज सपाटे यांनी छायाचित्रणाचे काम पाहिले.

तर शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा पर्यवेक्षक राजेंद्र जाधव यांनी सर्वांचे आभार मानले तर वंदे मातरम् या गीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा; महिलांमध्ये आनंदाचे वातावरण

तभा वृत्तसेवा

नळदुर्ग, दि.१७ ऑगस्ट-

राज्यातील महायुती सरकारने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा होत असल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. अनेक महिलांनी याबद्दल महायुती सरकारचे आभार मानले आहे.

राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्यातील महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत या योजनेसाठी पात्र ठरलेल्या महिलांना दर महिन्याला १५०० रुपये देण्याचा एक चांगला आणि क्रांतिकारी निर्णय राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यावर दि. १७ ऑगस्ट रोजी जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचे ३ हजार रुपये जमा होणार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते मात्र १७ ऑगस्ट पुर्वीच दि. १५ ऑगस्ट रोजी राज्यातील अनेक महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले आहेत.

> महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणही योजना अतिशय चांगली व महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारी आहे. मला आज पर्यंत कुठल्याच शासकीय योजनेचा लाभ मिळाला नाही. मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे ३ हजार रुपये दि. १५ ऑगस्ट रोजी माझ्या खात्यावर जमा झाल्याचा मेसेज माझ्या मोबाईलवर आला आणि मला अतिशय आनंद झाला. हा क्षण माझ्या दृष्टीने ऐतिहासिक आहे.याबद्दल मी महायुती सरकारचे अभिनंदन करून आभार मानते.
>
> **- सुनयना बनसोडे, नळदुर्ग**

तुळजापुर तालुक्यासह नळदुर्ग शहरातील अनेक महिलांच्या खात्यावर लाडकी बहीण योजनेचे ३ हजार रुपये जमा झाले आहेत. थेट महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाल्यामुळे महिलांनी आनंद व्यक्त केला आहे. मात्र ज्या महिलांच्या खात्यावर अद्याप हे पैसे जमा झाले नाहीत त्यांची मात्र आमच्या खात्यावर पैसे का जमा झाले नाहीत याची विचारपुस करण्यासाठी पळापळ सुरु होती मात्र येत्या १९ ऑगस्ट पर्यंत या योजनेतील सर्व पात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा होणार आहेत. राज्यातील महायुती सरकारने महिलांसाठी एक चांगली आणि महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी योजना जाहीर करून हे सरकार थांबले नाही तर बोलल्या प्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी दिलेल्या तारखेच्या आत या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यावर दोन महिन्याचे ३ हजार रुपये जमा करण्यास सुरुवात केली आहे त्यामुळे महिलांनी महायुती सरकारचे आभार मानले आहे.

या योजनेमुळे खऱ्या अर्थाने सामान्य महिला आज आर्थिक दृष्ट्या सक्षम होणार आहेत. कारण या योजनेतील पैसे थेट महिलांच्या बँक खात्यावर जमा होत आहेत. त्यामुळे या योजनेचे महिलांनी स्वागत केले आहे.

श्री शिवपूराण कथा सप्ताहाची रविवारी काल्याने सांगता

तभा वृत्तसेवा

मंगरुळ, दि.१७ ऑगस्ट-

पवित्र श्रावण महिन्यानिमित्त मौजे मंगरूळ ता. तुळजापूर येथे आयोजित श्री शिवपूराण कथा सप्ताहाचे रविवार १८ ऑगस्ट रोजी काल्याच्या संगीतमय सादरीकरनाणे सांगता होणार आहे

ग्रामदैवत कंचेश्वर मंदिरात रविवार ११ ऑगस्ट पासून चालू असलेल्या या सप्ताहात दररोज कंचेश्वरास अभिषेक, शिवपिंडीस बेलपत्र वाहने, शिवपाठ, शिवस्त्रोत, शिवकथा, भजन शिवजागर असे कार्यक्रम संपन्न होत आहेत. हभप अच्युत पुरी महाराज गावडी दारफळ यांच्या संगीतमय श्री शिवकथा किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहात शिवपूराण महात्म्य, सृष्टीखंड, सती खंड, पार्वती खंड, कुमारी खंड, युध्द खंड, शतरुद्र, कोटीरुद्र, यासारखे कथा वाचन करण्यात येत आहे यासाठी भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. काल्याच्या कीर्तनाचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आव्हाहन भजनी मंडळ मंगरूळ यांनी केले आहे.

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेटच्या सभासदांना १० टक्के लाभांश : संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांची वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषणा

ठेवींपेक्षा संस्थेचा स्वनिधी वाढवण्यासाठी प्रयत्न करणार

तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.१७ ऑगस्ट-

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा श्री सिध्दीविनायक परिवारचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केली. ठेवींपेक्षा स्व-भाग भांडवल वाढवीण्यार भर देणार असल्याचे यावेळी सांगितले.

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, १७ ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी ते बोलत होते. सभेस प्रमुख अतिथी म्हणून प्रगती नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रशांत पाटील, श्री विठ्ठल सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विक्रम पाटील, विधिज्ञ मंडळाचे माजी अध्यक्ष रवींद्र कदम, मधुकरराव जाधव, श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटीचे अध्यक्ष दिनेश कुलकर्णी, नागेश नाईक, ॲड.नितीन भोसले, योगेश कुलकर्णी, बालाजी कोरे, गणेश कामटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी म्हणाले की, सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटी ही ११ शाखांमार्फत ग्राहकांना बँकिंग सेवा पुरवित असून २६ हजार सभासद बँकेच्या सेवेने समाधानी आहेत.

मागील वर्षात संस्थेला ३ कोटी ६४ लाख रुपयांचा नफा झाला असल्यामुळे सभासदांना या आर्थिक वर्षात १० टक्के

लाभांश वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. त्याचबरोबर संस्थेचा स्वनिधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी संचालक मंडळाला केले.

सभेत उपस्थित मान्यवरांनीही संस्थेच्या कार्याचे अभिनंदन करुन संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या कार्यकुशलतेचे कौतुक केले. प्रारंभी बँकेचे अध्यक्ष दिनेश कुलकर्णी यांनी अहवाल वाचन केले. सभेत मांडलेल्या ठरावांना सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली. सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक राजकुमार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिक देवळे यांनी तर आभारप्रदर्शन देवीदास कुलकर्णी यांनी केले. वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार ज्ञानराज चौगुले यांचा भावसार समाजाच्या वतीने सत्कार

तभा वृत्तसेवा

लोहारा, दि.१७ ऑगस्ट-

लोहारा शहरातील भावसार समाजाला सभा मंडपचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी भावसार समाजाच्या वतीने दि.१७ ऑगस्ट २०२४ रोजी

आ.ज्ञानराज चौगुले यांच्याकडे केली. निधी देऊ असे आ.चौगुले यांनी आश्वासित केले. यावेळी भावसार समाजाच्या वतीने आ.ज्ञानराज चौगुले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन पणुरे, शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, माजी गटनेते अभिमान खराडे, माजी सरपंच अरुण (आबा) माळवदकर, प्रताप लोभे, राजेंद्र माळी, तालुका उपप्रमुख परमेस्वर साळुंके, नगरसेवक विजयकुमार ढगे, नगरसेवक अविनाश माळी, नगरसेवक अमिन सुंबेकर, नगरसेवक गौस मोमिन, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, नगरसेवक आरिफ खाणापुरे, शहर प्रमुख श्रीकांत भरारे, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, ओम कोरे, गगन माळवदकर, शिवराज झिंगाडे, सुरेश दंडगुले, दत्तात्रय माळवदकर, सुधीर झिंगाडे, अक्षय माळवदकर, प्रशांत माळवदकर, मेघराज हंबीरे, अमोल झिंगाडे, सौरभ झिंगाडे, सुरेश झिंगाडे, नागेश माळवदकर, प्रशांत अबुरे, संतोष झिंगाडे, दिगंबर भिंगे, सुमित झिंगाडे, यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

नालगाव येथे धनंजय सावंत यांची जनसंवाद बैठक संपन्न

गावाच्या विकासासाठी राजकीय गट तट विसरुन एकत्र या, एक कॉल आणि गावचा प्रॉब्लेम सॉल

तभा वृत्तसेवा

परंडा, दि.१७ ऑगस्ट-

राजकारणाच्या ठिकाणी राजकारण, तर समाजकार्यच्या ठिकाणी समाजकारण हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकी जपत जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी धनंजय सावंत यांच्या वतीने परंडा तालुक्यातील नालगाव येथे गावभेट व जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

दि.१७ रोजी नालगाव येथील मारुती मंदिर येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत गावातील नागरिकांच्या अडीअडचणी व विविध समस्या जानुन घेण्यात आल्या.

यावेळी गावात तलाठी, ग्रामसेवक, शासकीय दवाखान्यात कर्मचारी उपस्थित राहत नसल्याचे नागरीकांनी तक्रार धनंजय सावंत यांच्या समोर मांडली सावंत यांनी

संबंधित कर्मचाऱ्यांच्या वरीष्ठांना लागलीच तात्काळ फोनवरून संपर्क साधून उपस्थित राहत नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठांची चांगलीच कान उघडणी करुन जे कर्मचारी उपस्थित राहु शकतात अशाच कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नालगाव येथे करण्याचे सांगितले.

गावाच्या विकासासाठी राजकीय गट तट विसरुन एकत्र या अशी साद सावंत यांनी ग्रामस्थाना घातली. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या शिवारातील अनेक शेतरस्त्याची कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना भैरवनाथ उद्योग समूहाच्या यंत्रणेस दिल्या. यावेळी गावातील शक्य तेवढ्या समस्या भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने सोडवू असे त्यांनी नागरिकांना आश्वासन दिले.

यावेळी सरपंच महेश करळे, अंगद करळे, सचिन करळे, सुशिल करळे, बालाजी करळे, अरूण करळे, सिद्धेश्वर करळे, जिल्हा समन्वयक गौतम लटके, नागा पाटील आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

IN THE COURT SHRI. P. H. KRVE, DHOC DIST. COURT-1
MOTOR CCIDENT CLIM² TRIBUNL T OSMNBD
Notice to show cause
(General form)
(Sch. I..H. Form 4)
CLIM² RS. Rs. 7,00,000/-

Exh. 19
M..C.P No. 135/2022
Vasant Shrirang Jadhav, ...Claimant.
V/s
Naresh Tour, ... Respondents.

To,
3- Pankaj Shridhar Zirmire, ge Major Occ- Business, R/o Kanheri, Po. Sarola Tq. usa, Dist. Latur Mob No. 9565224912. (Owner of Car No. MH 06 BM² 4833)
Respondent

WHERES the above named Claimant - Vasant Shrirang Jadhav, ge 47 yrs., Occ- Service R/o. Samudrawani, Tq. and Dist. Osmanabad Mob No. 8975886959. has made an application to this court U/sec. 166 of M.V. ct regarding the compensation of Motor ccident, that copy of application sent herewith.

You are hereby summons to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the 24.10.2024 at 10.30 a. m. in the forenoon, to show cause against the application failing wherein the said application will be heard and determined Ex-parte.

lso take notice that in default to your failing to show cause on or before the date mentioned, you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the Court.

Date:-06/08/2024
Superintendent,
dhoc District Court 1, Osmanabad
(By Order)

IN THE COURT SHRI. P. H. KRVE, DHOC DIST. COURT-1
MOTOR ACCIDENT CLAIM² TRIBUNAL T OSMANABAD
Notice to show cause
(General form)
(Sch. I..H. Form 4)
CLAIM² RS. Rs. 7,00,000/-

Exh. 18
M..C.P No. 135/2022
Vasant Shrirang Jadhav, ...Claimant.
V/s
Naresh Tour, ... Respondents.

To,
2- Ulhas Yeshwant Palkar, ge Major Occ-Business R/o Raigad, Tq. Dist. Raigad (previous owner of Car No. MH-06 BM² 4833)
Respondent

WHERES the above named Claimant - Vasant Shrirang Jadhav, ge 47 yrs., Occ- Service R/o. Samudrawani, Tq. and Dist. Osmanabad Mob No. 8975886959. has made an application to this court U/sec, 166 of M.V. ct regarding the compensation of Motor ccident, that copy of application sent herewith.

You are hereby summons to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the 24.10.2024 at 10.30 a. m. in the forenoon, to show cause against the application failing wherein the said application will be heard and determined Ex-parte.

lso take notice that in default to your failing to show cause on or before the date mentioned, you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the Court.

Date:-06/08/2024
Superintendent,
dhoc District Court 1, Osmanabad
(By Order)

एकनिष्ठ राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा बीडमध्ये राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झाली सभा

तभा वृत्तसेवा
बीड दि.१७ ऑगस्ट

छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी शिवनेरी किल्ल्याहून निघालेली शिवस्वराज्य यात्रा गुरूवारी (दि.१५) रोजी बीड येथे आली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काढण्यात आलेल्या या यात्रेला बीडमध्ये मोठ्या उत्साहात प्रतिसाद मिळाला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या तसेच जिल्ह्यातील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सभा पार पडली. या सभेत बीड मतदारसंघातून विधानसभेसाठी महाविकास आघाडीचे भावी उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांना पुन्हा एकदा आशिर्वाद देऊन मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी द्या असे आवाहन सर्व उपस्थितांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार जेष्ठ नेते अमोल कोल्हे, बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे, पोहरादेवी देवस्थान चे महंत रमेश महाराज, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर, माजी आ.उषाताई दराडे, जेष्ठ नेते ड.डी.बी.बागल, सुशीला ताई मोराळे, हेमाताई पिंपळे, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पूजाताई मोरे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व बीड मतदारसंघातून सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संदीप क्षीरसागरांच्या मागे तुमचा आशीर्वाद असाच राहू द्या- जयंत पाटील

आम्ही शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून आपल्या दारात आलो आहोत. ज्याप्रमाणे गेल्या विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्याने सहापैकी चार जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिल्या होत्या त्याप्रमाणे यावेळीही सहाच्या सहा जागा शरदचंद्र पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला व महाविकास आघाडीला बीड जिल्हा देणार आहे. कारण लोकसभा निवडणुकीत ४०० पार चा नारा देणाऱ्या भाजपाला २४० पार करता करता नाकीनऊ आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे घटना बदलण्याची स्वप्न बाळगणाऱ्यांना भारतीय जनतेने रोख लावण्याचे रोख लावण्याचे काम केले. त्यामध्ये महाराष्ट्रातून महाराष्ट्रातून सर्वात मोठा वाटा बीडचा आहे. परंतु घटना बदलण्याचे स्वप्न अजूनही थांबलेले नाही मुळातच घटना बदलण्याची स्वप्न १९५२ पासून भाजपाचे असून मुंबई आणि महाराष्ट्र त्यांच्या ताब्यातून जोपर्यंत जाणार नाही तोपर्यंत त्यांना देशात धक्का बसणार नाही. ही बाब लक्षात घेऊन उद्याच्या विधानसभा निवडणुकीत घटना बदलण्याचे स्वप्न पाहणाऱ्या व जाती-धर्मांमध्ये वाद लावून आपल्या राजकीय पोळ्या भाजून घेण्याची प्रवृत्ती असलेल्या भाजपला धक्का देण्याचे काम करू. पवार साहेबांच्या विचारांशी आणि आपल्या जनमाणसांशी एकनिष्ठ राहून संदीप क्षीरसागरांसारखा तरुण आपली सेवा करत आहे. निश्चितच आपल्या अपेक्षा खूप सारे असतील परंतु त्यांची पूर्तता करण्यासाठी परिस्थिती अनुकूल नाहीये त्यामुळे येणाऱ्या काळात परिस्थिती आपल्या बाजूने आणावयाची आहे त्यासाठी तुम्ही आता सारखेच येणाऱ्या निवडणुकीतही आमदार संदीप क्षीरसागर यांच्या पाठीमागे रहा. असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

संदीप भैय्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच- खा. अमोल कोल्हे

जशी कामगिरी बीडच्या जनतेने लोकसभेला केली तशीच कामगिरी आता एकनिष्ठ असलेले युवा आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासाठी करावी कारण महाराष्ट्राने आमदार कसे विकत घेतात हे मागील दोन वर्षात पाहिले आहे. आपल्या स्वार्थासाठी सगळेजण आपल्या जनमताशी आणि विचारधारेशी गद्दारी करत असताना बीडमधून एकमेव एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून संदीप क्षीरसागर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यांनाही प्रलोभने आली होती. सत्तेचे गालिचे अंथरले जात असताना संदीप भैय्यांनाही गद्दारी करून त्यावर चालण्याची संधी मिळवता आली असती. परंतु हा पठ्ठ्या आपल्या विचारांशी आणि आपल्या माणसांच्या भावनांशी एकनिष्ठ राहिला. निश्चितच आपल्या अपेक्षा मोठ्या असतील त्या कदाचित पूर्ण झाल्या नसतील परंतु याचे कारण आपणा सर्वांना ठाऊक आहे की जो कोण आमदार गद्दारी करून सत्तेत सहभागी झाला नाही त्याच्या मतदारसंघात एक रुपयाही निधी न जाऊ देण्यासाठी सत्ताधारी काटेकोरपणे सावध गिरी बाळगत होते. परंतु मतदारसंघाला निधी न दिल्यास त्याचे नुकसान आमदाराला नव्हे तर त्या मतदारसंघाला आणि जनतेला होत असते. हे आपल्याला माहित आहे.

पर्यावरण मानवी जीवनात वृक्षांचे महत्व अधिक वक्ष लावा व वृक्ष जगवा मोहीम

तभा वृत्तसेवा
बीड दि.१७ ऑगस्ट

बीड शहरात साई मंदिर परिसर खंडेश्वरी मार्गिका येथे वृक्ष लावण्यासाठी कृष्णा इगडे याना देण्यात आले (लिंब ,चिंच) यावेळी प्राचार्या दिप्ती पोहेकर स्वा सावरकर महाविद्यालय बीड उपप्राचार्य ढेरे उपप्राचार्य लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर प्रा हसंराज जोशी प्रा संजय काळे प्रा सोनवणे प्रा शशिकांत पसारकर प्रा वैरागकर प्रा साळवे व सहकारी

ओबीसी महामंडळाच्या कर्जविषयक योजनांची माहिती

तभा वृत्तसेवा
बीड दि.१७ ऑगस्ट

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार, जन शिक्षण संस्थान बीड द्वारा सुरू असलेल्या पीएम विश्वकर्मा प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थी यांना. ओबीसी महामंडळाच्या कर्जविषयक योजनांची माहिती देण्यात आली.

ओबीसी समाजातील पारंपारिक व्यावसायिकांच्या आर्थिक विकासासाठी ओबीसी आर्थिक विकास महामंडळाचे वसुली निरीक्षक श्री कृष्णा कळसाने यांनी ओबीसी महामंडळ अंतर्गत *शैक्षणिक कर्ज योजना, २०% बीज भांडवल कर्ज योजना, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना* इत्यादींची सविस्तर माहिती देताना खालील प्रकारच्या कागदपत्रांची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यामध्ये

आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, बँक पासबुक, पासपोर्ट साईज फोटो, जात प्रमाणपत्र ,आठ लाखाच्या आत उत्पन्न असलेले प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म प्रमाणपत्र किंवा निर्गम उतारा या पैकी एक, लाईट बिल ,गॅस कनेक्शन कार्ड ,राशन कार्ड, डोमासाईल प्रमाणपत्र किंवा ग्रामसेवक यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट किंवा प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्र आवश्यक असल्याचे सांगितले.यावेळी अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख, यांची उपस्थिती होती तसेच सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर,सहायक कार्यक्रम अधिकारी श्री धर्मराज जाडकर,सौ सुमेधा मनसबदार, सामाजिक कार्यकर्ते श्री नितीनजी क्षीरसागर,नाभिक समाज सा घटनेचे जिल्हाध्यक्ष तथा प्रशिक्षक श्री विशाल वाघमारे यांची उपस्थिती होती.

गजानन विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
नवगण राजुरी दि.१७ ऑगस्ट

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे ध्वजारोहण युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य केशव भांगे हे होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त बोलताना युवा नेते हेमंत क्षीरसागर यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्व सांगून स्पर्धेत टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान घ्यावे. नवगण राजुरीच्या गजानन विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवावी असे त्यांनी सांगितले तसेच प्राचार्य केशव भांगे यांनी स्वातंत्र्य दिनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी रामदास बहीर, प्रकाश उपरे, बाबूराव जमदाडे, जानबा पवार, विकास टुले, कल्याण जमदाडे, लक्ष्मण पांढरे, रामचंद्र बहीर, अनिल बहीर, नवनाथ बहीर, विनोद पवार, पांडूरंग बहीर, दत्तात्रय टुले, शिवाजी गवळी, संतोष गावडे, सचिन पवार, अच्युत लगड, ज्ञानेश्वर केंडे, अजय गायकवाड, दत्ता गावडे, शशिकांत पवार, अर्जुन पवार, राहुल टुले, सागर वनगुजरे यांच्यासह शाळेचे उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीला आले यश

आत्मदहनाचा इशाऱ्यांने मनरेगा रक्कम जमा करण्यास सुरुवात!

तभा वृत्तसेवा
केज दि.१७ ऑगस्ट

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला होता तरी रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीने केज तालुक्यातील विहीर लाभार्थी, शेतकरी यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या विहीरीची रक्कम शासनाने १६/०८/२०२४ रोजी शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर विहीरीची रक्कम जमा करण्यास सुरुवात केली असून केज तालुक्यातील शेतकरी आनंदी झाले आहे तरी रोहन गलांडे पाटील यांनी असे म्हटले आहे आत्मदहन करण्याचा इशारा मागे घेत असुन जर गारगोटा विहीर रक्कम जमा करण्यास अडथळा निर्माण झाला तर दोन कोटी पेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईपर्यंत यापुढेही केज तालुक्यातील शेतकऱ्यांनसाठी विहीर,गायगोटे दोन कोटी रक्कम पुर्ण जमा होईपर्यंत केज तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मी खंबीर पने उभा राहणार आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

दोन कोटी पेक्षा जास्त रक्कम केज तालुक्यातील शेतकऱ्यांना मनरेगा योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे शेतकऱ्यांना मिळणार आहे तरी पुर्ण रक्कम जमा होईपर्यंत केज तालुक्यातील शेतकऱ्यांनच्या पाठीशी उभा असणारा आहे - रोहन गलांडे पाटील

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai
"दीनदयाळ भवन", परळी रोड, अंबाजोगाई, जि.बीड ४३१५१५. फोन-२४४६-२४६२२६/२५फैक्स-२४४६-२४६२१५
जा.क्र.दीम.बमुसो/सरफेसी/०४/परळी-वै/सोसी-३१/४९/२०२४-२५ दिनांक ०९.०८.२०२४
वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी
अॅक्ट २००२ (२००२ चा ५४) च्या नियम ९(१)(४) नुसार ताबा सूचना
ताबा सूचना
प्रति,
(१) मे. विष्णु कृष्णराव पुरवा प्रा.मर्यादित नागरिक बाबाजी (कर्जदार)
पत्ता:- मु.पो.हेडोळ, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५.
(२) श्री. प्रभाकर लक्ष्मणराव देशमुख
पत्ता:- भगवान कृपा, शिवाजी नगर, वीरेंद्र रोड,परळी-वैजनाथ,जि.बीड.४३१ ५१५.
(३) श्री. बाबासाहेब लिंबाजी फड
पत्ता:- मु.पो.कन्हेरवाडी, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५.
(४) श्री. रामदास माणिक आंधळे
पत्ता:- मु.पो.हेडोळ, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५
(५) सौ.अर्चना श्रीराम मुंडे
पत्ता:- शास्त्री नगर, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५
(६) श्री. केशव रामराव मुंडे
पत्ता:- शास्त्री नगर, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५
(७) श्री. वैजनाथ रामराव मुंडे
पत्ता:- शास्त्री नगर, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५
(८) श्री. श्रीराम प्रभाकर मुंडे
पत्ता:- शास्त्री नगर, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५
विषय:- वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी अॅक्ट२००२ (२ रा) च्या कलम १३(४) नुसार ताबा सूचना
संदर्भ:- बँकेची डिमांड नोटीस क्र.04/CC-11/SARFAESI/08/2024-25 दिनांक १५.०५.२०२४ प्रलंबित.
महोदय,
(मालमत्ता तारणकर्ते नाव:- श्री. केशव रामराव मुंडे व श्री. वैजनाथ रामराव मुंडे)
पत्ता: परळी वैजनाथ,जि.बीड वैजीत शास्त्री नगर, नगर परिषद हद्दीचा जुन घर क्र.१२४, नवा घर क्र.१११ व्यवा विस्तीर्ण क्र.४४८१, जुना आर्ई क्र.०८, नवा आर्ई क्र.१०, क्षेत्रफळ पूर्व-पश्चिम-दक्षिण बाजु २८'६", पश्चिम-दक्षिण बाजु ३४' आणि दक्षिण-उत्तर ४१ फु., एकुण क्षेत्र १०१.५४ चौरसफेट १२०८.६५ चौ.फु.
पूर्व- [illegible]
पश्चिम- [illegible]
दक्षिण- [illegible]
उत्तर- [illegible]
("नोटीस मालमत्ता तारणे ताबा तारणे ताबा घेण्याबाबत")
अधिकृत अधिकारी

DNS Bank Ltd. Ambajogai
[illegible]
अंबाजोगाई

DNS Bank Ltd. Ambajogai
[illegible]
अंबाजोगाई

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

बांग्लादेशात हिंदूवरील हल्ल्यांचा सकल हिंदू समाजाकडून तीव्र निषेध

हिंगोलीत बंदला शंभर टक्के प्रतिसाद, हजारो हिंदूंचा मोर्चा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

बांग्लादेशात सत्तांतरानंतर कट्टरपंथीयांकडून तेथे असलेल्या अल्पसंख्यांक हिंदू समाजाला टारगेट करीत त्यांच्यावर हल्ले होत आहेत. हिंदूची मंदिरे उध्वस्त करण्यात येत आहेत. हिंदूची घरे, दुकाने जाळण्यात येत आहेत. या घटनांच्या निषेधार्थ हिंगोली जिल्हा बंदची हाक देत हजारो हिंदू बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढीत या घटनांचा निषेध केला आहे. तसेच केंद्र सरकारने बांग्लादेशातील अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूना संरक्षण देण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर तेथे राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याठिकाणी कट्टरपंथीयांकडून मागील काही दिवसांपासून हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. घरे, दुकानांना आग लावण्यात येत आहे. मंदिराची तोडफोड करून मंदिरे उध्वस्त करण्यात येत आहेत. हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतरही बांग्लादेशात अल्पसंख्यांक हिंदू समाजावर हल्ले चालूच आहेत. जीव वाचविण्यासाठी हजारो हिंदू बांधव पलायन करण्याच्या तयारीत आहेत. आंदोलने करीत आहेत. बांग्लादेशात आजही हिंदू असुरक्षित आहेत. त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झालेला आहे.

कट्टरपंथीयांकडून हिंदूंना टारगेट केल्या जात असल्याने भारतातील हिंदू समाजामध्ये तीव्र संताप पसरत आहे. देशातील हिंदू समाजाने बांगला देशातील हिंदूवर होणारे अन्याय आणि अत्याचार थांबविण्यासाठी ठिकठिकाणी मोर्चा काढून या घटनांचा तीव्र निषेध केला आहे.

हिंगोली येथे दि १७ ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाच्यावतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शंभर टक्के प्रतिसाद देत सर्व व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली. येथील गांधी चौकातून सकल हिंदू समाजाकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यासह हिदुत्ववादी संघटनांनी सहभाग घेतला होता. यावेळी बांगला देशातील हिंदूवरील अत्याचाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आ गजाननराव घुगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सुभाष लदनिया, दिपक निमोदीया, राजेंद्र हलवाई, प्रकाशचंद सोनी, रमेशचंद बगडीया, मुरलीधर हेडा, सुदर्शन कंदी यांच्यासह हजारो हिंदू बांधवांनी सहभाग घेतला होता. भरपावसात हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी जिल्हाधिकारी खुशालसिहं परदेशी यांना शिष्टमंडळाच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.

कलकत्ता येथील घटनेच्या निषेधार्थ हिंगोलीत डॉक्टरांचा बंद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

पश्चिम बंगालमधील कलकत्ता येथील आर जी कर इस्पितळात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची अमानुषपणे हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ तसेच आरोपींना कठोर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी इंडियन मेडीकल असोसिएशनच्यावतीने हिंगोलीत डॉक्टरांनी एक दिवसाचा बंद पाळीत जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

पश्चिम बंगालमधील आर जी कर इस्पितळात एका ३१ वर्षीय महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची अमानुषपणे हत्या करण्यात आली. या घटनेतील आरोपींचा तत्काळ शोध लावून त्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी तसेच डॉक्टरांच्या संरक्षणासाठी केंद्रीय कायदा बनविणे, सर्व रूग्णालयांच्या सुरक्षा प्रोटोकॉल कोणत्याही विमानतळापेक्षा कमी नसावा, रूग्णालयात सीसीटीव्ही आणि सुरक्षा कर्मचारी तैनात करून सुरक्षित क्षेत्र म्हणून घोषीत करावे, निवासी डॉक्टरांना विश्रांतीसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. वॉर्ड आणि डॉक्टरांच्या विश्रांतीच्या ठिकाणांच्या स्थितीनुसार ड्युटीचे तास मर्यादीत केले जावेत, बलात्कार सारख्या गुन्ह्यांचा तपास बारकाईने व निश्चित कालमर्यादेत व्हावा आणि दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, शोकग्रस्त कुटुंबाला झालेल्या क्रौर्याशी सुसंगत योग्य व सन्मानजनक भरपाई देण्यात यावी या मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले आहे. तत्पूर्वी आयएमएच्यावतीने मोर्चा काढून आर जी कर इस्पितळात महिला डॉक्टरवरील बलात्काराविरोधात डॉक्टरांनी जोरदार निदर्शने करीत घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष डॉ सचिन बगडीया, सचिव डॉ यशवंत पवार, कोषाध्यक्ष डॉ नितीन अग्रवाल, डॉ सत्यनारायण सोनी, डॉ जयदीप देशमुख, डॉ श्रीधर कंदी, डॉ माधुरी देशमुख, डॉ सौंदनकर, डॉ रामदेव अग्रवाल, डॉ उमा सोनी, डॉ गजानन धाडवे, डॉ अशोक पातुरकर आदींची उपस्थिती होती. हा बंद दि १८ ऑगस्टच्या सकाळी सहा वाजेपर्यंत पाळण्यात येणार आहे. अत्यावश्यक रूग्णसेवा सुरू ठेवण्यात आली आहे. या आंदोलनात सुमारे २५० डॉक्टर सहभागी झाले आहेत.

हिंगोली– कलकत्ता येथील आर जी कर रूग्णालयात एका ३१ वर्षीय महिला डॉक्टरवर बलात्कार करून अमानुषपणे हत्या करण्यात आली. या विरोधात सकल हिंदू समाजाच्यावतीने हिंगोलीत बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला व्यापाऱ्यांनी शंभर टक्के प्रतिसाद देत व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवली होती. छाया– सुनील पाठक

हिंगोलीत तालुकास्तरीय योगासन स्पर्धेला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय हिंगोलीद्वारा आयोजित तालुकास्तर शालेय योगासन क्रीडा स्पर्धा १६ ऑगस्ट रोजी जि.प.कन्या प्रशाला हिंगोली येथे घेण्यात आल्या.

स्पर्धेचे उद्घाटन गंगाधर सानप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश गंगावणे, संजय भूमरे, शिवाजीराव इंगोले, गजानन आडे, श्रीमती सरकटे उपस्थित होते. यावेळी पंच म्हणून रामप्रकाश व्यवहारे, कैलास शैव, संजय भूमरे, शिवाजीराव इंगोले व श्रीमती सरकटे यांनी काम बजावले. अंतिम निकालामध्ये १४ वर्ष मुलीमध्ये शेळके रूपाली प्रथम, गोगटे अपर्णा द्वितीय, मुळे रोहिनी तृतीय, बोधनकर शिल्पा चौथा, मरळे आराध्या पाचवा, गरकर जान्हवी सहावी, बांगर खुशी सातवी सरजुदेवी कन्या विद्यालय तर १७ वर्ष मुली अंतीम निकालात विद्यासागर विद्यालय खानापरू चित्ता येथील जाधव प्रिती प्रथम, जाधव प्रतिक्षा द्वितीय, पवार वेदिका तृतीय, जाधव पूजा चौथा, सरजुदेवी कन्या विद्यालयाची शर्मा भूमी पाचवा, राऊत शृती सहावा, जि प कन्या प्रशालेची बगाटे प्रिती सातवा, १९ वर्ष मुली अंतिम निकालामध्ये सरजुदेवी कन्या विद्यालयाची खिल्लारे सरस्वती प्रथम, शेख आलीया द्वितीय, निधानकर प्राप्ती तृतीय, सरकटे तन्वी चौथा, गायकवाड माहेश्वरी पाचवा, हत्तागळे दृशा सहावा, दिपके अंजली सातवा, १७ वर्ष मुले अंतिम निकाल विद्यासागर विद्यालय खानापूर चित्ता येथील मुंढे ओमकार प्रथम, मुंढे ऋषिकेश द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

संक्षिप्त वृत्त

काठोडा तांडा रास्तभाव दुकानदाराविरोधात तक्रार

औंढा नागनाथ– तालुक्यातील काठोडा येथील रास्त भाव दुकानदार लाभार्थ्यांना अंगठा घेऊन धान्य देत नसल्याने काठोडा तांडा येथील ग्रामस्थ यांनी तहसील कार्यालयात येथे नायब तहसीलदार अनिता कोलगणे यांना निवेदन देत इतर ठिकाणी दुकान जोडून ग्रामस्थ लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निवेदनावर सरपंच रंजनाबाई राठोड, उपसरपंच सुमनबाई चव्हाण, अंबादास राठोड, बाबाराव पवार, फुलसिंग पवार परविन राठोड, मारुती राठोड, पांडुरंग चव्हाण, विश्वनाथ जाधव पंडित राठोड, देविदास राठोड, जयवंत चव्हाण यासह ४० ते ५० ग्रामस्थांच्या निवेदनावर सह्या आहेत.

रेसन्स इंग्लीश स्कुलमध्ये ध्वजारोहन

हिंगोली– रेसन्स इंग्लिश स्कूल शिरड शहापूर तर्फे १५ ऑगस्ट भारताचा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्याचा रणसंग्राम, ही पथनाटिका आंबेडकरचौकामध्ये सादर करण्यात आली. शाळेमध्ये झेंडावंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर, शिरड शहापूर मधील मुख्य रस्त्यांवरून प्रभात फेरी काढण्यात आली. त्यावेळी या पथनाटिकेसोबतच' विविधतेमध्ये एकता' हे सार घेऊन प्री प्रायमरी च्या विद्यार्थ्यांनी, भारतामधील विविध राज्यातील वेशभूषा केलेल्या होत्या.शाळेच्या मैदानामध्ये, आठ वाजता रेसन्स इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष मिलिंद यंबल यांनी तिरंगा फडकविला. रेसन्सच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विविध स्वातंत्र्याचे शुभेच्छापत्र, घोषवाक्य तयार केले याची प्रदर्शनी देखील लावण्यात आली होती.या वेळी शाळेच्या प्रमुख मार्गदर्शक अश्विनी यंबल, सरपंच यशवंत रावले तसेच शिरड शहापूर व परिसरातील नागरिक व पालक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक वृंदांनी प्रयत्न केले.

कलकत्ता येथील घटनेच्या निषेधार्थ दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे निदर्शने

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

कलकत्ता येथील आर जी कर इस्पितळात ३१ वर्षीय महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची अमानुषपणे हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ हेडगेवार दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी निदर्शने करीत या घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गांधी चौकापर्यंत हेडगेवार दंत महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थींनींनी रॅली काढीत वुई वॉन्ट जस्टीस, आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे आदी घोषणा दिल्या. यावेळी विद्यार्थींनींनी महिला डॉक्टरांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात शासनाने कडक कायदा करून डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदा करण्याची तसेच कलकत्ता येथील महिला डॉक्टरांवर अत्याचार करणाऱ्या तसेच हत्या करणाऱ्या आरोपींना कठोर शिक्षा करावी अशी मागणी केली. यावेळी मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थींनी सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजनेत १ लाख ७६ हजार ७९४ लाभार्थी महिला

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १ लाख ७९ हजार २०५ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १ लाख ७६ हजार ७९४ पात्र लाभार्थी महिलांचे अर्ज ठरले असून, केवळ १७९४ अर्ज तात्पुरते अपात्र ठरले आहेत. उद्या शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उद्या शनिवार (दि.१७) रोजी बालेवाडी क्रीडांगण (पुणे) येथे राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, हिंगोली येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात दुपारी १ वाजता जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत १ जुलै २०२४ ते १६ ऑगस्टपर्यंतची ही आकडेवारी असून, या प्राप्त अर्जांची छाननी करुन त्यांना मंजुरी देण्याचे काम सुरु आहे. ग्रामीण भागातील जास्तीत जास्त पात्र महिला लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधून अर्ज भरावेत.

ज्या पात्र इच्छुक महिला लाभार्थांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत त्यांनी संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज भरावेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी केले आहे. अनेकांच्या खात्यावर पैसे जमा झाले असून बँकांमसोर रांगा लागत आहेत.

राष्ट्रमाता जिजाऊ विद्यालयात चित्रकला रंगभरण स्पर्धेचे बक्षीस वितरण

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑगस्ट

राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन व राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक सुधाकर मेटकर तसेच प्रमुख उपस्थिती संस्थेचे सचिव पंडित शिरसाट, संस्थेचे उपाध्यक्ष संजयसिंह गहेरवार, पंडित अवचार, नाईक, जांभळे स्पर्धेच्या परीक्षक सौ इच्छा गरड, प्राचार्य उमेश शेळके, मुख्याध्यापक शिवशंकर डोल्हारे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेमध्ये १ ली ते ४ थी गटामधून प्रथम आर्याही अभिषेक नाईक, द्वितीय क्रमांक विराज अमोल राठोड, तृतीय क्रमांक विराज वाघमारे, उत्तेजनार्थ अनुष्का अर्जुन बांगर तसेच ५वी ते १० वी गटामधून प्रथम क्रमांक स्वप्निल देविदास जाधव ,द्वितीय क्रमांक वनराज शिवाजी चिलगर, तृतीय क्रमांक आदर्श अमित महाजन व उत्तेजनार्थ स्नेहा बालाजी वडीपल्ली या विद्यार्थ्यांनी सर्व मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्रा.सौ.ज्योती भट, प्रा. संदीप जाधव, प्रा. मुरलीधर डोल्हारे, प्रा. शिवराज तरकसे, प्रा.ज्ञानेश्वर शिरसाट, प्रा. इरफान, सौ बोरकर, बल्लाळ, सौ टेकाळे, सौ जोजार, सौ पाईकराव, श्री कान्हेड, सौ ठोके, सौ कान्हेड, पठाडे, नाईक, शशिकांत बोरकर, इमरान शेख, सौ नरवाडे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

आ. राजु नवघरे यांच्या उपस्थितीत मुस्लीम युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

तभा वृत्तसेवा
वसमत, १७ ऑगस्ट

ढोल ताशाचा गजरात मोटर सायकल रॅली काढत नुराणी फंक्शन हॉल वसमत येथे समीर सम्राट व त्यांच्यासोबत मुस्लिम बांधवांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर आणि आ राजु नवघरे यांच्या कार्य कर्तृत्वावर विश्वास ठेऊ, बिनशर्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठ्या जल्लोषात पक्ष प्रवेश केला.

यावेळी आ. राजू नवघरे यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून अभिनंदन केले. पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित जिल्हा नियोजन सदस्य समिती मोबिन भाई, शहराध्यक्ष मुजीब पठाण, कार्याध्यक्ष अमजद खान, माजी नगरसेवक शमीम सिद्दिकी, रफिउला खान, दिपक कातोरे, सय्यद इम्रान, इम्रान फारुकी, प्रताप कराळे, सचिन दगडू, प्रशांत अण्णा शिंदे, संचालक ज्ञानेश्वर बेंडे, आशिर्वाद इंगोले, युवक विधानसभा अध्यक्ष, युवक तालुकाध्यक्ष मनोज भालेराव, अर्षद, युसुफ उर्फ मिठू गुत्तेदार, कलीम पहेलवान, पठाण, असिफ, साजिद, अमजद पठाण, माजिद इनामदार, कोषाध्यक्ष नविद अहमद, अमजद पठाण, बाबु शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

केंद्रात व राज्यात महिला-भगीणींचे हीत बघणारे सरकार कार्यरत : गिरीश महाजन

तभा वृत्तसेवा
भोकर,१७ ऑगस्ट -

केंद्रात व राज्यात महिला भगिनींचे हित बघणारे त्यांचे बळकटीकरण सक्षमीकरण व सामाजिक मानसन्मान वाढवून मुख्य प्रवाहात आणणारे सरकार कार्यरत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक अभियान आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज येथे केले.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय शुभारंभ पुणे येथून मुख्यमंत्र्यांनी केले. त्याचवेळी नांदेड जिल्ह्याचा जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम जिल्ह्यातील भोकर येथे आज थाटात संपन्न झाला. हजारो महिलांच्या उपस्थितीतील या कार्यक्रमांमध्ये राज्यातील शासन हे विविध योजनांच्या माध्यमातून दृश्य स्वरूपात महिला भगिनींच्या पाठीशी आहे. राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिला संदर्भात नवीन आर्थिक क्रांती असून यामुळे महिलांच्या सामाजिक सन्मानामध्ये वाढ झाली आहे, प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाला पालकमंत्र्यांसह माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछेडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, माजी आमदार अमर राजूरकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगाराणी अंबुलगेकर, श्रीजया चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा कदम, महिला व बालविकास अधिकारी रूपाली रंगारी, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला आपल्या परंपरागत बंजारा पेहराव मध्ये आलेल्या महिला लक्ष वेधून घेत होत्या. ज्या महिलांना तीन हजार रुपये मिळाले त्यांना प्राथमिक स्वरूपात प्रमाणपत्र ही यावेळी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्रतिनिधी स्वरूपात महिलांनी राज्य शासनाच्या या योजनेबद्दल आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

यावेळी पालकमंत्री म्हणाले, केंद्र व राज्यातील सरकारने महिलांच्या सन्मानार्थ विविध योजना सुरू केल्या आहे. केंद्रात आलेल्या शासनाने दहा वर्षापूर्वी घरातील महिलांना स्वयंपाकाच्या धुराचा त्रास होऊ नये यासाठी उज्वला गॅस योजना सुरू केली. केंद्र सरकारने २० कोटी महिलांना गॅस उपलब्ध करून दिला आहे. आम्ही राज्य सरकारने आणखी त्यामध्ये भर घातली असून आता महिलांना तीन सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत.महिलांना एसटी भाडे ५० टक्के माफ करण्यात आले आहे. राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले जाणार आहे. बचत गटाच्या बळकटीकरणाकडे अधिक लक्ष देण्यात येत असून सोळा हजार कोटींचा पतपुरवठा करण्यात आला आहे. हक्काचे घर, प्रत्येकाला घर,प्रत्येक घरात शौचालय आणि आता प्रत्येक घरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे.

यावेळी उपस्थित महिलांना संबोधतांना त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ज्या महिलांना अद्याप पैसे मिळाले नसतील त्यांनाही ते मिळतील याबद्दल आश्वस्त केले.३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत ठेवण्यात आली आहे. ही योजना कायमस्वरूपी असेल. त्यामुळे या संदर्भात कोणी काही गैरसमज पसरवत असेल तर त्याला बळी पडू नका, असे आवाहन केले.मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ महिलांनी घ्यावा,बचत गट स्थापन करावेत असे आवाहनही केले. यावेळी त्यांनी सगळ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले की नाही अशी उपस्थित महिला समुदायाला विचारणा केली. ज्यांनी आतापर्यंत अर्ज केला नसेल त्या सर्व महिलांना अर्ज करायला सांगा असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी संबोधित केले. केंद्र व राज्य शासन महिलांसाठी नवनवीन योजना आणत असून त्या सर्व योजनांचा वापर भोकर पासून तर नांदेड पर्यंत सर्वांना मिळेल याची खात्री बाळगा. आपल्या जीवनामध्ये बदल करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी खासदार अजित गोपछडे श्रीजया चव्हाण यांनीही यावेळी संबोधित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा कदम यांनी केले.

संक्षिप्त वृत्त

खरीप अनुदान वाटपासाठी तहसीलदार यांना निवेदन

देगलूर-देगलूर तहसील कार्यालय येथे सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणी करून सुद्धा सोयाबीन अनुदान वाटपासाठी गाव पातळीवर प्राप्त ई पीक पाहणी यादीमध्ये नावाची नोंद नसल्यामुळे अनेक शेतकरी बांधव अनुदानापासून अपात्र ठरलेले आहेत त्यामुळे त्या शेतकऱ्यांना योग्य चौकशी करून अनुदान द्यावे असे निवेदन तहसीलदारांना कुरूडगी गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आले. यावेळी कुरूडगी नगरीचे सरपंच सदाशिवराव पाटील, सरपंच प्रतिनिधी शंकरराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य रमेश कोकले व तसेच शाहीर कोकले उपस्थित होते. यावेळी तहसीलदार नागमवाड यांनी निवेदन स्वीकारून अपात्र झालेल्या शेतकऱ्यांची नावे शासनाला कळविण्याचे आश्वासन दिले.

हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात ईस्लापूर बाजारपेठ बंद

नांदेड-सध्या बांगलादेशातील हिंदूंची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. बांगलादेशातील हिंदू अत्याचार, भेदभाव, आणि हिंसाचाराचा सामना करत आहेत. त्यांच्या अस्तित्वासाठी लढा देत आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी आणि हक्कांसाठी जागतिक स्तरावर आवाज उठवण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठीच आज दि.१७ ऑगस्ट रोजी ईस्लापूर येथे बांगलादेशमध्दे हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात आणि कत्तली विरोधात निषेध करण्यासाठी ईस्लापूर बाजारपेठ बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला . या बंद मध्ये अनेक राजकीय नेते,कार्यकर्ते तसेच सामान्य जनतेनेही खूप मोठ्या संख्येने सहभाग घेऊन त्यांच्या मनातील असंतोष आणि दु:ख व्यक्त केले. बांगलादेशात हिंदूंवर होणारे अत्याचार अत्यंत भयंकर आहेत. त्यांच्या घरांची लूटमार, मंदिरांचा विध्वंस, महिलांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे तिथला संपूर्ण हिंदू समाज भयभीत झाला आहे. या मोर्चाच्या माध्यमातून आम्ही जागतिक समुदायाला आवाहन केले की, हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात कठोर पाऊले उचलावीत जेणेकरून तिथल्या हिंदूंना योग्य न्याय आणि सुरक्षा मिळेल.या बंद मधील सर्व व्यापारी वर्गाचा सहभाग पाहून ईस्लापूर येथील एकजूट आणि शक्तीचे दर्शन घडले.

यशवंत पॅरामेडिकल कॉलेज येथे स्वातंत्र्य दिवस साजरा.

नांदेड- येथील वाघी वाघी रोड हसापूर ,नांदेड येथील यशवंत पॅरामेडिकल कॉलेज, येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजावंदन समारोह साजरा करण्यात आला यावेळी राष्टध्वजाचे ध्वजारोहण हे समाजसेवक मो.झकीयोद्दिन अजिजोदिन सिद्दीकी (एक्स.आर्मी) यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी यशवंत पॉरमेडीलक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सय्यद नौशिन उपाध्यक्ष शहनाज सय्यद चांद, सचिव तथा व्यवस्थापक लोटस हॉस्पिटल शाहेद सय्यद चांद व यशवंत पॅरामेडिकल कॉलेजचे संपूर्ण शिक्षक व स्टाफ उपस्थित होता.

नागरिकांच्या हिताच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात :आशाताई शिंदे

तभा वृत्तसेवा
नांदेड,१७ ऑगस्ट -

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी लोहा तहसील कार्यालयातील ध्वजावंदनास उपस्थित राहून प्रशासनाला सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात अशा सुचना केल्या.

यावेळी तालुक्यातील माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. लोहा पंचायत समिती कार्यालयाला नुकताच खडज मानांकन प्राप्त झाल्यामुळे पंचायत समिती कार्यालयाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डि .के.आडेराघो व कार्यालयीन प्रशासन अधिकारी सतीश चोरमले, कनिष्ठ कार्यालयीन प्रशासन अधिकारी प्रियदर्शन वाघमारेसह टीमचे कौतुक केले. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मेहनतीमुळे पंचायत समितीला आय.एस.ओ मानांकन मिळाल्यामुळे सर्वांचे आभार मानले.तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी पीक पाहणी रद्द करावे व सरसकट शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावे असे सांगितले. यावेळी उपसभापती श्यामअण्णा पवार, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, बोरगावचे पुंडलिक बोरगावकर, बाजार समितीच्या संचालिका पूनमताई क्षिरसागर, चेअरमन नागेश हिलाल, संचालक सुधाकर सातपुते, संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य अशोक सोनकांबळे, व्यंकटी आढाव, अजय हंकारे, भरत गायकवाड, प्रसाद जाधव, अमोल गोरे , माजी नगरसेविका पुष्पलता कापुरे यासह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

उमरी शहर कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा
उमरी,१७ ऑगस्ट -

बांग्लादेशात हिंदूवर क्रुर पद्धतीने अन्याय अत्याचार तेथिल धर्मांध लोकांनी करीत दंगली घडवून अनेक हिंदू मंदिरे उद्धस्त करीत महिलावर आत्याचार होत असल्याच्या निषेध म्हणून उमरी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले.

जिल्हातील हिंदू संघटनांनी बांग्लादेशातील हिंदू वर क्रुर अन्याय झाल्याने त्या घटनेचा निषेध करण्यासाठी दि १७ ऑगस्ट रोजी जिल्हा बंद ची हाक दिली होती. त्या अनुषंगाने. उमरी शहरातही १७ ऑगस्ट रोजी सकाळ पासुनच कोणीच दुकाने , हॉटेल , पानपट्टी , बाजारपेठ , व्यापार पेठ, बियर अन्ड बॉर , खानावळ , शाळा महाविद्यालये उघडलेच नाहीच उमरी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले आहे. विशेषता उमरी शहरात हिंदू - मुस्लीम ऐक्य असल्याने मुस्लीम समाज बांधव सर्व दुकाने बंद करून निषेधात सहभाग नोंदवला शहरात कांही अनुचित प्रकार घडू नये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे म्हणून पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी पोलिस फोर्सचा घेवून चोक बंदोबस्त ठेवला होता.

सिडकोत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा ;ठिकठिकाणी ध्वजारोहण

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड,१७ ऑगस्ट -

सिडको येथील सिडको कार्यालय व मनपा क्षेत्रीय कार्यालय येथे ७८वा स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते तर सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी संभाजी कास्टेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सिडको येथे सिडको म्हणाप्पा कार्यालय येथे दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक सात वाजता राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यालयाची कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे कर पर्यवेक्षक संजय नागापूरकर, प्रकाश दर्शनी, मारुती सारंग, स्वच्छता निरीक्षक किसन वाघमारे, अर्जुन बागडी यांच्यासह मालूम यनफळे, महेंद्र पठाडे, चौरे नथुराम, दीपक नागरे, दीपक जोंधळे, राहुल पाईकराव,यशवंतकर रमेश विठ्ठल आंबटवार, बालाजी लोहगावकर, लोखंडे विवेकानंद, पवळे रवींद्र, अशोक भंडारे, नरेंद्र सिंगे प्रशांत चावरे ,सौ.अर्चना जोंधळे,सौ. मिनाताई आडबलवार, मुक्ताबाई धर्मेकर, मदन बैस त्यांची उपस्थिती होती.तर सिडको कार्यालय येथे सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण सकाळी सात वाजता करण्यात आले यावेळी कार्यालयाचे कर्मचारी संकेत गिरी, विलास जोशी यांच्यासह सुरक्षारक्षक यांची उपस्थिती होती.

रक्षाबंधन निमित्त 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' महिला मेळावा

तभा वृत्तसेवा
नांदेड,१७ ऑगस्ट -

अल्पावधीतच महिलांच्या पसंतीस उतरलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' योजनेअंतर्गत 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' (रक्षाबंधन) महिला मेळावा शहरातील कौठा भागातील मातोश्री मंगल कार्यालय येथे आयोजीत करण्यात आला असुन या मेळाव्याची जबाबदारी माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर, महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्यावर रक्षाबंधन निमित्त देण्यात आली आहे. हा मेळावा रविवार (दि.१८) रोजी सायं.४.०० वाजता पार पडणार आहे. या मेळाव्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ऑनलाइन सहभागी होणार आहेत. यासंदर्भाने नियोजनाची बैठक माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर नांदेड येथील संपर्क कार्यालयात पार पडली.

यावेळी भाजपा नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, भाजपा महानगर सरचिटणीस डॉ. शितलताई भालके,भाजपा युवा मोर्चा महानगराध्यक्ष बंटी मल्होत्रा, भाजपा प्रदेश कार्यकारिणी बाळू खोमणे, माजी महिला मोर्चा महानगराध्यक्ष वैशालीताई देशमुख, धनश्रीताई देव, सरचिटणीस अमोल कदम, युवा मोर्चा प्रदेश सचिव अनिल बोरगावकर, मंडळाध्यक्ष मारुती वाघ,सुरेश लोट, जसबीरसिंघ धुपीया, महादेवी मठपती यांच्यासह आदिजण उपस्थित होते.

या योजनेमुळे लाखो भगिणींना दिलासा मिळाला आहे. या योजनेचा निधी जिल्ह्यातील असंख्य महिलांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर भाजपा प्रदेश कार्यालयाच्या वतीने 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' (रक्षाबंधन) निमित्त महिला मेळावे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आयोजित करण्यास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी सांगितले होते.

या बैठकीत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या महिला मेळाव्याची नांदेड जिल्ह्याची जबाबदारी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, महिला आघाडीच्या श्रद्धा चव्हाण व प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्याकडे सोपविली आहे.

निवघ्यात स्मशानभूमीसाठी गावकऱ्यांचा एल्गार

तभा वृत्तसेवा
मुदखेड,१७ ऑगस्ट -

निवघा तालुका मुदखेड गावातील प्रमुख समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेचा प्रश्न निकाली निघत नसल्याने तसेच स्मशानभूमी जाण्यासाठी रस्ता नसल्याने मरणानंतरही यातना सोसाव्या लागत असल्यामुळे गावकऱ्यांनी आता प्रमुख मागण्यांसाठी एल्गार पुकारला असून प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रमोद व्यंकटराव पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटेल का याची आस गावकऱ्यांना लागली आहे. या गावात मराठा, बौद्ध, लिंगायत, मुस्लिम या समाजाचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. मराठा व बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीस जागा उपलब्ध असली तरी जाण्या येण्यासाठी रस्ताच नसल्याने पावसाळ्यात अंत्यसंस्काराचा शेवटचा प्रवास सुद्धा चिखलातून होत आहे. यासाठी गावकऱ्यांनी अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासन व लोकप्रतिनिधीनी टोलवाटोलवीच केलेली आहे. निवडणुकीच्या तोंडावर मुरूम टाकून थातुर मातुर डागडुजी केली जाते पुन्हा या प्रश्नाकडे ढुंकूनही बघितले जात नाही. यासोबतच लिंगायत व मुस्लिम समाजाच्या स्मशानभूमीच्या दफन विधीचा प्रश्न मोठा आहे. स्थानिक प्रशासनाकडे गावठाण जागा असूनही जागेचा प्रश्न सोडविला जात नाही याबाबत प्रशासनाला अनेक वेळा निवेदन देऊनही गांभीर्याने घेतली जात नाही असा ग्रामस्थांचा आरोप आहे.

गावातील विविध समाजाच्या स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यांसाठी सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने निर्णय घ्यावा या संदर्भात सन २०१८ मध्ये तहसीलदार यांना आदेश देऊन ग्रामस्थांचा प्रशांत भूमीचा प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात पत्र दिले होते परंतु यावर प्रशासनाने कुठलाही निर्णय घेतला नसून गेल्या अनेक वर्षापासून स्मशानभूमीच्या रस्त्याचा व जागेचा प्रश्न अजूनही प्रलंबितच आहे. एक वर्षापूर्वी स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषण केले असता संबंधित प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी तोंडी व लेखी आश्वासन देऊन स्मशानभूमीचा रस्ता व जागेचा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले होते परंतु आजपर्यंत यावर कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसून मृतदेहाची विटंबना सुरूच आहे. दफनविधी जागेच्या सुरक्षीं भिंतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधीचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद व्यंकटराव पवार यांनी ग्रामस्थांच्या एलगारातून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे उपोषणाचा आजचा चौथा दिवस असूनही संबंधित अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी कुठलीही दखल घेतली नाही. मृतांच्या होणाऱ्या विटंबनेचा प्रवास केव्हा थांबणार हेच पहावे लागणार आहे.

तोडगा न निघाल्यास प्राण त्याग करणार :प्रमोद पवार

गावातील लिंगायत तसेच मुस्लिम समाजाच्या जागा उपलब्ध नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून या समाजाच्या लोकांना आपापल्या सोयीनुसार दफनविधी क्रिया करावी लागते. मुस्लिम समाजाच्या दफनविधीसाठी जागा नसल्याने त्यांचा प्रश्न एरणी आला आहे. मराठा व बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पावसाळ्यात चिखलमय झाला असून अजूनही हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू असून याबाबत तोडगा न निघाल्यास समाजाच्या हितासाठी प्राण त्याग करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष प्रमोद पवार यांनी दिला.

रस्त्याचे काम लवकर पुर्ण करण्याच्या सुचना : तहसीलदार आनंद देऊळगावकर

विविध समाजाच्या स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यासंदर्भात सुरू असलेल्या आमरण उपोषणाबाबत तहसीलदार यांना विचारणा केली असता स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचा मजबुती करण्यासंदर्भात संबंधित गुत्तेदार यांना काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रशासनाच्या वतीने स्थानिक प्रशासनास जागेचा प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात पत्रव्यवहारही करण्यात आलेला असल्याची माहिती तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी दिली.

किनवट शहरासह ग्रामिण भागात आ. केराम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
देगलूर,१७ ऑगस्ट -

किनवट- माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस किनवट शहरासह ग्रामीण भागात प्रचंड उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला असून यानिमित्त हुतात्मा गोंडराजे मैदानात हजारोच्या उपस्थितीत आ.भीमराव केराम यांना क्रेनमशीनद्वारे ४०० किलोचा भव्यहार घालून अभिष्टचिंतन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांनी सकाळपासून हार तुरे घेऊन अलोट गर्दी केली होती.किनवट मतदारसंघात कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे केल्यामुळे भीमराव केराम हे आतार्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत अशा भावना या यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

किनवट विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस दि १५ ऑगस्ट२०२४ रोजी किनवट व माहूर तालुक्यातील गाव,वाडी व तांड्यात विविध उपक्रम राबऊन उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

सकाळी ५ वा पेंदा येथील प्रसिद्ध नागढव मंदिरात आमदार भीमराव केराम यांनी मनोभावे विधिवत पूजा अर्चना करून दिवसाची सुरुवात केली. यावेळी नागढव देवस्थानचे मुख्य पुजारी बाळू महाराज,विधानसभा निवडणूक प्रमुख बाबुराव केंद्रे युवानेते विवेक केंद्रे व नागनाथ कराड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. त्यानंतर साई मंदिरात जाऊन त्यांनी दर्शन घेतले असून यावेळी गुरुस्वामी पवार तसेच माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी त्यांचा सत्कार करून अभिष्टचिंतन केले. अभिष्टचिंतनाचा मुख्य कार्यक्रम किनवट येथील हुतात्मा गोंडराजे मैदानात आयोजित केला होता.यावेळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत व फटाक्यांची जोरदार आतिशबाजी करत, ढोल ताशाच्या गजरात आमदार भीमराव केराम यांना ४०० किलो वजनाचा भव्य दिव्य हार मोठ्या क्रेनमशीनद्वारे घालून कार्यकर्त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.भाजपाचे युवानेते कुलदीप चिकाटे,सचिन आठवले संभाजी सोनकांबळे व त्यांच्या मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले.त्यानंतर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष विनोद भरणे यांनी महात्मा फुले चौक येथे वाढदिवसानिमित्त आ भीमराव केराम यांचा भव्य सत्कार करून शुभेच्छा दिल्या तसेच यानिमित्त भोजनदान दिले. समता नगर येथील तक्षशिला बौद्ध विहारात महिला मंडळाच्यावतीने वाढदिवस साजरा केला असून यावेळी तालुक्यातील विकासकामाबद्दल कौतुक केले वाढदिवसानिमित्त आ. भीमराव केराम यांना पेढे भरूऊन शुभेच्छा

दिल्या. भाजपा ओबीसी आघाडीच्या वतीने तालुका अध्यक्ष शेखर चिंचोळकर यांनी सारखणी येथे वाढदिवस आयोजित केला होता. यावेळी आ. भीमराव केराम यांचे आगमन होताच त्यांच्यावर जे सी बी मशीनद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली व भव्य हार घालून वाढदिवस जल्लोशात साजरा केला. तालुक्यातील सावरगाव, बोधडी घोटीफाटा, सारखणी, चिखली खुर्द,बेल्लोरी धा.पालाईगुडा,थारा, गोकुदा पंचायत समिती कार्यालय गोकुंदा येथील आदिवासी संशोधन केंद्र यासह ठीक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त सकाळपासून किनवट येथील लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात तसेच त्यांच्या निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, कार्यकर्ते हितचिंतक चाहते व नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी हार तुरे घेऊन दिवसभर अलोट गर्दी केली होती. विशेष म्हणजे सोशल मीडियावर दिवसभर सर्वचस्तरातून शुभेच्छाचा वर्षाव झाल्याचे दिसून आल्यामुळे भीमराव केराम हे कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे करणारे आतापर्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह अनेकांनी दिल्या शुभेच्छा

दरम्यान वाढदिवस असल्याचे कळतात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण, माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून आमदार भीमराव केराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.